cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–११ | सोमवार दि.३० मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### टंचाई, साठेबाजी आणि व्यवस्थेचा गोंधळ

सध्याच्या इंधनपरिस्थितीकडे केवळ किमतींच्या चढउताराच्या दृष्टीने पाहणे अपुरे ठरेल; कारण ही समस्या आता आर्थिक, सामाजिक आणि प्रशासकीय अशा तिन्ही स्तरांवर तीव्र होत चालली आहे. कृत्रिम टंचाई, जागतिक युद्धजन्य परिस्थिती, तेल कंपन्यांचे तोटे आणि शासनाची मर्यादित हस्तक्षेपक्षमता या सगळ्या घटकांनी मिळून सामान्य माणसाचे जगणे अधिकच कठीण केले आहे.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफी निकषांवर संभ्रम कायम

## पात्र, अपात्रचे निकष ठरणार कधी आणि कसे, समितीकडे लक्ष

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी महत्त्वाची कर्जमाफी विषयक बातमी समोर आली असून, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत सविस्तर माहिती देताना स्पष्ट केले की, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ केले जाणार आहे. याशिवाय, नियमित कर्जफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे. दरम्यान, कर्जमाफीसाठी नेमके पात्र कोण आणि अपात्र कोण याबाबत अद्याप स्पष्ट निकष जाहीर न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.**




या निर्णयामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या अल्पभूधारक आणि अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, या कर्जमाफीच्या अंमलबजावणीची जबाबदारी प्रवीण परदेशी समितीकडे सोपवण्यात आली असून, संपूर्ण प्रक्रियेसाठी सध्या 'स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर' तयार करण्याचे काम वेगाने सुरू आहे. मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, कर्जमाफीचा लाभ खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्यांपर्यंतच पोहोचला पाहिजे. "ज्यांच्याकडे गाड्या, बंगले, फार्महाऊस आहेत अशा धनदांडग्या लोकांना कर्जमाफी देण्यात काही अर्थ नाही," असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. त्यामुळे या योजनेत श्रीमंत घटकांना वगळून आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना प्राधान्य देण्याचा शासनाचा स्पष्ट कल दिसून येतो. मात्र अनेक शेतकरी या निर्णयाची अंमलबजावणी कशी होणार, कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता भासणार, याबाबत साशंक आहेत. शासनाने नेमलेल्या अभ्यासगटाकडून अहवाल तयार करण्याचे काम सुरू असून, हा अहवाल सादर झाल्यानंतरच अंतिम निकष जाहीर होणार आहेत. तज्ज्ञांच्या मते, कर्जमाफीची प्रक्रिया यावेळी अधिक काटेकोर आणि किचकट असण्याची शक्यता असून, प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी ▶▶ पान २ वर

### अंमलबजावणी किचकट असणार

दरम्यान या कर्जमाफी मध्ये कोण पात्र, कोण अपात्र होणार याबाबत अद्यापही शेतकऱ्यांमध्ये संभ्रमता आहे. कारण कर्जमाफी विषयीची निकषता शासनाकडून प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. मात्र राज्य शासनाच्या माध्यमातून एक अभ्यास गट समिती नेमण्यात आली असून या समितीच्या माध्यमातून अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. हा अहवाल सादर केल्यानंतर ही कर्जमाफी कोणाची होणार आहे हे निश्चित होणार आहे. कर्जमाफी किचकट प्रक्रियेच्या माध्यमातून राबवली जाईल, अशी शक्यता आता निर्माण झाली आहे. कारण महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत सूतोवाच दिले आहे.

## थोडक्यात...

### मोदी यांची केरळमध्ये डाव्या आघाडीवर टीका

पालक्काडः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (२९ मार्च, २०२६) केरळच्या पालक्काड येथे एका सभेत सांगितले, केरळमधील बदल हा लोकांचा आशीर्वाद, भाजपा कार्यकर्त्यांचे अथक प्रयत्न आणि त्यांचे बलिदान यांमुळे घडत आहे. विरोधी पक्षांवर जोरदार टीका करताना मोदींनी आरोप केला, दशकांपासून एलडीएफ आणि यूडीएफने 'घोटाळ्यां'च्या दरम्यान सत्तेची अदलाबदल केली, तरीही लोकांसमोर पोकळ दावे करत एकमेकांविरुद्ध कधीही कारवाई केली नाही. ते पुढे म्हणाले, विधानसभा निवडणुकीत भाजपा ही 'ए–टीम' आहे, हे एलडीएफ आणि यूडीएफ या दोघांनीही मान्य केले आहे. दरम्यान, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी रविवारी (२९ मार्च, २०२६) पुरुलिया येथे एका सभेत सांगितले, बंगाल निवडणुकीपूर्वी एसआयआर द्वारे १.२ कोटी मतदारांची नावे हटवण्यात आली आहेत.

### रशिया पूर संकटात ३ लाख लोक अडकले

मॉस्को : आखाती प्रदेशात सुरू असलेल्या युद्धामुळे संपूर्ण जगाची झोप उडाली आहे, त्याचबरोबर रशियादेखील युक्रेनसोबतच्या युद्धात व्यस्त आहे. अशातच आता रशियावर निसर्गाची अवकृपा पहायला मिळत आहे. युक्रेन युद्धात अनेक वर्षे अडकलेल्या रशियावर आता नवीन संकट कोसळले आहे. देशाच्या काही भागात पूरस्थिती निर्माण झाली असून अनेक ठिकाणी वीजपुरवठाही पूर्णपणे खंडित झाला आहे. त्यामुळे पुतिन सरकारची डोकेदुखी वाढली आहे, सरकारला काही भागात आणीबाणी जाहीर करावी लागली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, दक्षिण रशियातील दागेस्तान प्रदेशात मुसळधार पाऊस आणि पुरामुळे जनजीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाले आहे. या प्रदेशाची राजधानी माखाचकला येथे परिस्थिती बिघडल्याने प्रशासनाने आणीबाणी जाहीर केली आहे. सतत होत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचले असून मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठा खंडित झाला आहे. आपत्कालीन सेवांना अलर्टवर ठेवण्यात आले आहे, प्रभावित लोकांना मदत करण्यासाठी बचाव आणि मदतकार्य वेगाने सुरू आहे.

### भोंदू खरातवर कारवाईस विलंब–अमृता फडणवीस

मुंबईः भोंदू अशोक खरात प्रकरणात यापूर्वीच कारवाई व्हायला हवी होती. असे झाले असते तर बऱ्याच गोष्टी टाळता आल्या असत्या. अनेक स्त्रियांचे जीवन वाचले असते, असे रोखठोक मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी व्यक्त केले आहे. भोंदू अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. त्याला आज नाशिक येथील एका कोर्टापुढे हजर केले असता कोर्टाने त्याला ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. त्यामुळे तो आता १ एप्रिलपर्यंत कोर्टातच राहणार आहे. तूर्त त्याच्या काळ्या कारवायांचे अनेक व्हीडीओ सोशल मीडियावर सध्या व्हायरल होत आहेत. या पार्श्वभूमीवर अमृता फडणवीस यांनी एका कार्यक्रमात बोलताना उपरोक्त विधान केले आहे. त्या म्हणाल्या, अशोक खरात प्रकरण खूपच भयानक आहे. त्यातून बऱ्याच गोष्टी बाहेर येणार आहेत. कोणत्याही बाबांवर डोळे बंद करून विश्वास ठेवणे योग्य नाही.

# राष्ट्रवादीच्या दैवतांना डावलून स्वत: देव बनण्याचा प्रयत्न करू नका अमोल मिटकरी यांचा स्वकीयांवरच निशाणा



मुंबई । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसचे आक्रमक आमदार आणि प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ माजली आहे. ज्यांच्या नेतृत्वावर कार्यकर्त्यांचा विश्वास आहे, त्यांचाच फोटो हटवला जातो आहे, असे म्हणत मिटकरींनी पक्षांतर्गत वादाला तोंड फोडले असून, त्यांचा हा रोख नेमका कोणाकडे आहे, यावरून आता तर्कवितर्कांना उधाण आले आहे.**

अमोल मिटकरी यांनी आपल्या अधिकृत एक्स हँडलवरून पक्षातील सद्यस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे का? असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यांनी त्यांच्या पोस्टमध्ये दिवंगत अजित पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांचे फोटो वापरून ▶▶ पान २ वर

### तटकरेंच्या रायगडमध्ये बॅनरवरून अजित पवार–सुनेत्रा पवारांचा फोटो गायब



रायगडमध्ये राष्ट्रवादीच्या कार्यक्रमाच्या बॅनरवरून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि दिवंगत अजित पवार यांच्यासह पक्षश्रेष्ठींचे फोटो गायब झाल्याचे समोर आले आहे. या बॅनरवरून राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर पक्षफोडीचे वेगवेगळे आरोप होत आहेत. तटकरेंचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या रायगडमध्ये बॅनरवरून राष्ट्रवादीच्या पक्षश्रेष्ठींचे फोटो गायब झाल्याचे दिसत आहे. रायगड जिल्हा परिषद निवडणुकीतील प्रचार सभांच्या बॅनरवर देखील केवळ खासदार सुनील तटकरे यांच्या व्यतिरिक्त कोणाचेही फोटो छापण्यात आले नव्हते. मंत्री आदिती तटकरे यांच्या मतदारसंघांतील इंदापूर येथे नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपीठावरील बॅनरवर खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्यासह स्थानिक नेत्यांचे फोटो लावण्यात आले. अजित पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह पक्षश्रेष्ठींचे फोटो लावण्यात आले नाहीत.

### पक्षात अंतर्गत धुसफूस?

गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) काही मुद्द्यांवरून अंतर्गत मतभेद असल्याच्या चर्चा दबक्या आवाजात सुरू होत्या. अमोल मिटकरी यांच्या या पोस्टने त्या चर्चांना अधिक बळ दिल्याचे बोलले जात आहे. निवडणुकीच्या काळात किंवा महत्त्वाच्या कार्यक्रमांत कोणाचे फोटो लावायचे आणि कोणाचे टाळायचे, यावरून पक्षात दोन गट पडले आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मिटकरींच्या या सूचक विधानानंतर पक्षातील वरिष्ठ नेते यावर काय प्रतिक्रिया देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## ३० मार्च ते ४ एप्रिल दरम्यान विदर्भासह राज्यात वादळी पाऊस

पुणे । प्रतिनिधी

३० मार्चपासून राज्यात आभाळी हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ३० मार्च रोजी प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. उर्वरित विदर्भात देखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो. ३० मार्चच्या तुलनेत ३१ मार्च रोजी एकंदरीत वादळी पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता ▶▶ पान २ वर

## आष्टीचे उपअभियंता निंबाळकर निलंबित

बीड । प्रतिनिधी

**कामे न करताच बिले काढण्याचे प्रकार बीड जिल्ह्यात होतात, हे अनेकदा उघड झाले आहे. याबाबतीत याबाबत तक्रारी करून सर्वच सामील असल्यामुळे अनेकदा काहीच कारवाई झाली नाही, अशी अनेक उदाहरणे आहेत. मात्र बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी शाळेचे बांधकाम न करताच बोगस देयक सादर केल्याप्रकरणी आष्टीचे प्रभारी उपाभियंता मधुकर निंबाळकर यांना तडकाफडकी निलंबित केले आहे.**

आष्टी तालुक्यातील एका शाळेचे पाच लाखाचे काम न करताच आष्टी उपविभागाकडून देयक सादर करण्यात आले. या बोगस कामाची तक्रार झाली. या कामाच्या चौकशी करण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता मोमीन यांना ▶▶ पान २ वर

## ई–गव्हर्नन्समध्ये पर्यावरण विभाग पाचव्या स्थानी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विशेष गौरव

मुंबई । प्रतिनिधी



राज्य शासनाच्या '१५० दिवसांच्या कृती आराखडा' अंतर्गत राबविण्यात आलेल्या ई–गव्हर्नन्स कार्यक्रमात पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत १५९.२९ गुणांसह मंत्रालयीन विभागांमध्ये पाचवे स्थान पटकावले आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विभागाच्या सचिव जयश्री भोज यांचा आज गौरव करण्यात आला.


सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. यावेळी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे सचिव, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशाबद्दल विभागाच्या सचिव जयश्री ▶▶ पान २ वर

## तुळजाभवानी देवीचे मंदिर २२ तास खुले

### चैत्र पौर्णिमेनिमित्ताने मंदिर प्रवेशाच्या नियमातही बदल

तुळजापूर । प्रतिनिधी

**भाविकांची मोठ्या प्रमाणावर होणारी गर्दी लक्षात घेता मंदिर प्रशासनाने महत्त्वाचे निर्णय घेतले असून महोत्सव काळात मंदिर २२ तास खुले ठेवण्यात येणार आहे. तसेच भाविकांना सुरळीत व सुलभ दर्शन मिळावे यासाठी उद्यापासून मंदिरात प्रवेशासाठी बीडकर पायऱ्या मार्गाचा वापर करण्यात येणार आहे.**



श्री तुळजाभवानी मंदिर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही चैत्र पौर्णिमा महोत्सव ३० मार्च २०२६ ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरा ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२८ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १७६.०० क्विंटल | २,१३२ | २,६११ | २,२८८ |
| ज्वारी/हायब्रिड: ६६.०० क्विंटल | १,९३० | ४,५११ | ३,१६२ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.०० क्विंटल | ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: ४१.०० क्विंटल | २,४०० | ३,०६० | २,६५७ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: ५,४०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| हरभरा: १५.०० क्विंटल | ४,९५१ | ५,०७१ | ५,०११ |

## राजकारण करू नका भारताचे यश वाखाणण्या जोगे

### मन की बात कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी यांचे प्रतिपादन

दिल्ली । वत्तसंस्था

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (२९ मार्च, २०२६) नमूद केले की, पश्चिम आशियातील परिस्थितीमुळे "आव्हानात्मक काळ" निर्माण झाला आहे आणि या मुद्द्याचे "राजकारण" करणाऱ्यांना असे करण्यापासून परावृत्त होण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यांनी भारतीयांना या संकटाशी संबंधित अफवांवर विश्वास ठेवण्याबाबत सावधगिरी बाळगण्याचे आवाहनही केले.**



आपल्या मासिक 'मन की बात' संबोधनादरम्यान बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, कोविड–१९ महामारीनंतर, जग पुन्हा एकदा प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करेल अशी अपेक्षा होती. तथापि, जगाच्या विविध भागांमध्ये युद्ध आणि संघर्षाची परिस्थिती सतत निर्माण होत आहे. सध्या आपल्या शेजारी एक महिन्यापासून भीषण युद्ध सुरू आहे. आपले लाखो कुटुंबीय, जवळचे आणि प्रियजन या देशांमध्ये राहतात, विशेषतः आखाती देशांमध्ये काम करतात. मी आखाती देशांचा ▶▶ पान २ वर

# औषधांच्या किमतीही कडाडणार !

## इराण युद्धामुळे आरोग्य क्षेत्रालाही बसणार फटका

मुंबई । प्रतिनिधी

**इराण–अमेरिका युद्धामुळे केवळ पेट्रोल–डिझेलच नाही, तर आता तुमच्या स्वयंपाकघरातील प्लास्टिकचे डबे, बादल्या आणि अगदी औषधांच्या किमतीही कडाडणार आहेत.**




युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे कच्च्या मालाच्या (पॉलिमर) किमतीत मोठी वाढ झाली आहे. भारतातील अनेक कंपन्यांनी प्लास्टिकच्या कच्च्या मालाच्या दरात मोठी वाढ केल्याने सर्वसामान्यांचे बजेट कोलमडणार आहे. पुढे आलेल्या माहितीनुसार, होमोपॉलिमर पॉलीप्रोपाईलीनच्या किमतीत प्रति टन ४,००० रुपयांची, तर कोपॉलिमर आणि पॉलीइथिलीनच्या दरात प्रति टन ७,००० रुपयांची वाढ झाली आहे. या महिन्यात तब्बल चार वेळा (१, ३, ११ आणि २५ मार्च) हे दर वाढवण्यात आले आहेत. पॉलिमरचा वापर दैनंदिन वापरातील अनेक वस्तूंमध्ये होतो. विशेष बाब म्हणजे, प्लास्टिक दरवाढीचा फटका आरोग्य क्षेत्रालाही बसणार आहे. 'असोसिएशन ऑफ इंडियन मेडिकल डिव्हाईस इंडस्ट्री' नुसार, होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे प्लास्टिकच्या खर्चात ५०–६० टक्के ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# टंचाई, साठेबाजी आणि व्यवस्थेचा गोंधळ

सध्याच्या इंधनपरिस्थितीकडे केवळ किमतींच्या चढउताराच्या दृष्टीने पाहणे अपुरे ठरेल; कारण ही समस्या आता आर्थिक, सामाजिक आणि प्रशासकीय अशा तिन्ही स्तरांवर तीव्र होत चालली आहे. कृत्रिम टंचाई, जागतिक युद्धजन्य परिस्थिती, तेल कंपन्यांचे तोटे आणि शासनाची मर्यादित हस्तक्षेपक्षमता या सगळ्या घटकांनी मिळून सामान्य माणसाचे जगणे अधिकच कठीण केले आहे.ङ्ककेंद्र सरकारने उत्पादन शुल्कात केलेली कपात कागदोपत्री दिलासा देणारी वाटत असली तरी प्रत्यक्षात त्याचा परिणाम जनतेपर्यंत पोहोचत नाही, हीच या निर्णयाची सर्वात मोठी मर्यादा ठरते. पेट्रोलवरील उत्पादन शुल्कात मोठी घट करूनही, आणि डिझेलवरील शुल्क शून्यावर आणूनही, दरात अपेक्षित घट दिसत नाही. कारण आपल्या देशातील इंधनदर निश्चितीची जबाबदारी तेल विपणन कंपन्यांवर आहे. त्या कंपन्यांवर जागतिक बाजारातील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा मोठा दबाव आहे. परिणामी, सरकारचा दिलासा हा प्रत्यक्षात कंपन्यांच्या तोट्याची भरपाई करण्यापुरताच मर्यादित राहतो, जनतेसाठी तो 'नाममात्र' ठरतो.

आंतरराष्ट्रीय स्तरावर घडणाऱ्या घटनांचा भारतासारख्या आयात-आधारित देशावर किती खोल परिणाम होतो, याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या तणावाने कच्च्या तेलाच्या किमतींना अक्षरशः पंख लागले. काही आठवड्यांतच ब्रेंट क्रूडचे दर ७० डॉलरवरून ११०-१२० डॉलरपर्यंत पोहोचले. हा वाढीचा वेग केवळ आकड्यांत नाही, तर त्यामागे असलेल्या जागतिक अस्थिरतेचेही द्योतक आहे. भारतासारख्या देशाला याचा थेट फटका बसणे अपरिहार्यच आहे. कारण आपण आपल्या गरजेपैकी बहुतांश कच्चे तेल आयात करतो. तेल कंपन्यांची आर्थिक स्थितीही या पार्श्वभूमीवर चिंताजनक बनली आहे. पेट्रोल आणि डिझेल विक्रीतून त्यांना मोठा तोटा सहन करावा लागत असल्याचे संकेत दिले जात आहेत. त्यामुळेच सरकारने उत्पादन शुल्कात कपात करून त्यांच्यावरचा भार काही प्रमाणात कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, हा उपाय दीर्घकालीन नाही. उलट, जर ही परिस्थिती अशीच कायम राहिली, तर कंपन्यांना दरवाढीचा मार्ग स्वीकारावा लागू शकतो. याचा थेट परिणाम पुन्हा ग्राहकांवरच होणार आहे. परंतु, या सगळ्या आर्थिक गणितांपेक्षा अधिक गंभीर बाब म्हणजे देशातील इंधन वितरण व्यवस्थेची बिघडलेली अवस्था. सरकारी पातळीवर पुरेसा साठा असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात अनेक शहरांत आणि गावांत पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागलेल्या दिसतात. काही पंप पूर्णपणे कोरडे पडल्याच्या घटना समोर येत आहेत. गॅस सिलिंडर वितरणातही मोठा विलंब होत असून, बुकिंगनंतर ४५ दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे. ही परिस्थिती केवळ गैरसोयीची नाही, तर ती लोकांच्या दैनंदिन जीवनावर थेट परिणाम करणारी आहे. याच पार्श्वभूमीवर काही ठिकाणी काळाबाजार, साठेबाजी आणि नियमभंगाचे प्रकार वाढताना दिसत आहेत. काहीजण मोठ्या प्रमाणावर इंधन साठवून ठेवत आहेत, तर काहीजण भविष्यातील नफ्याच्या अपेक्षेने त्याचा गैरवापर करत आहेत. ही प्रवृत्ती केवळ अनैतिक नाही, तर ती टंचाई अधिक तीव्र करण्यास कारणीभूत ठरते. अशा परिस्थितीत प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. केवळ ''पुरेसा साठा आहे'' असे निवेदन देऊन जबाबदारी संपत नाही; तर प्रत्यक्षात वितरण सुरळीत ठेवणे, काळाबाजार रोखणे आणि नियमांचे काटेकोर पालन करवून घेणे आवश्यक आहे.ङ्कआज सामान्य नागरिकाची सर्वात मोठी अपेक्षा म्हणजे स्थिरताकिमान इतकी तरी की, त्याला रोजच्या गरजांसाठी इंधन मिळेल. किंमती कमी होणे ही अपेक्षा सध्या अवास्तव वाटत असली, तरी उपलब्धतेत सातत्य असणे ही किमान गरज आहे. शासनाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. वितरण व्यवस्थेत पारदर्शकता, साठ्याचे योग्य नियोजन आणि स्थानिक पातळीवरील नियंत्रण यंत्रणा मजबूत करणे या उपाययोजना तातडीने राबविणे आवश्यक आहे. दिर्घकालीन दृष्टीने पाहता, भारताने इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी ऊर्जा स्रोतांवर अधिक भर देणे ही काळाची गरज आहे. सौर, वारा आणि इतर नवीकरणीय ऊर्जास्रोतांचा विकास, तसेच इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार याकडे वेगाने पावले उचलली नाहीत, तर अशा संकटांचा सामना पुन्हा पुन्हा करावा लागेल.

एकूणच, सध्याची इंधनस्थिती ही केवळ तात्पुरती अडचण नसून, ती व्यवस्थात्मक कमतरतांचा परिपाक आहे. त्यामुळे तातडीच्या उपाययोजनांसोबतच दीर्घकालीन धोरणात्मक बदलांचीही आवश्यकता आहे. अन्यथा, सामान्य माणूस महागाई, टंचाई आणि अनिश्चिततेच्या या त्रिकोणात अडकूनच राहील.

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## २५३२ घरकुलासाठी ३० कोटी ३८ लाखाचा निधी मंजुर

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अंतर्गत २५३२ वैयक्तिक घरकुल मंजुर आहेत. या मंजुर घरकुलासाठी प्रत्येकी एक लक्ष २० हजार रुपये प्रमाणे निधी प्राप्त झाला आहे.**

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना पहिला शासन निर्णय क्रमांक ३८११ दि. २२ जुलै २०२४ आणि दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ रोजी निघालेल्या योजनेंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अंतर्गत जिल्ह्यातील २५३२ घरकुलांसाठी एक लक्ष २० हजार प्रमाणे ३० कोटी ३८ लाख ४० हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी आणि त्यांच्या अधिनस्त कर्मचारी यंत्रणा उपक्रम राबवण्यासाठी प्रयत्नशील आहे.

# पाटोद्यात मोठ्या उत्साहात पार पडली बीटीएस परीक्षा ;तालुक्यातील ३१७ विद्यार्थ्यांचा सहभाग

**पाटोदा । प्रतिनिधी**

**सध्याच्या स्पर्धेच्या युगात बालवयापासूनच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा. या उद्देशातून त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची माहिती व्हावी,या हेतूने पाटोदा येथील ओम कोचिंग क्लासेस चे संचालक प्रा.सोमीनाथ खंडागळे यांच्या समन्वयातून रविवारी रोजी एज्युमेट अकॅडमी संचलित भारत टॅलेंट सर्च ही परीक्षा पार पडली. पाटोदा शहरातील केंद्रावर तब्बल ३१७ विद्यार्थ्यांनी या परीक्षेतून आपले टॅलेंट आजमावले आहे.**

सध्याच्या स्पर्धा परीक्षांच्या युगात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी माहिती असणे गरजेचे आहे. या हेतूने गतवर्षीपासून बीटी एस म्हणजेच भारत टॅलेंट सर्च ही बालवयासाठी जनरल नॉलेज तसेच इतर उपयुक्त विषयांवर आधारित स्पर्धा परीक्षा घेण्यात येते. पहिली ते आठवीचे विद्यार्थी या परीक्षेमध्ये सहभागी होतात. या परीक्षांमध्ये भाषा परिसर अभ्यास भाषा गणित विज्ञान भूगोल अशा विषयांमध्ये परीक्षा होते. पहिलीच्या विद्यार्थ्यांना केवळ भाषा गणित आणि परिसर अभ्यास दुसरीच्या विद्यार्थ्यांनाही भाषा गणित परिसर अभ्यास तिसरी चौथी भाषा गणित परिसर अभ्यास पाचवी ते सहावी भाषा गणित विज्ञान भूगोल तर सातवी ते आठवीतील विद्यार्थ्यांना भाषा गणित विज्ञान भूगोल या विषयांवर आधारित ५० ते ७५ प्रश्न संख्या यामध्ये विचारली जाते तर १०० ते १५० गुणांची ही परीक्षा प्रत्येक वर्षी घेण्यात येत आहे. पाटोदा तालुक्यात या परीक्षेला विद्यार्थ्यांकडून आता चांगला प्रतिसाद मिळत असून यंदा तब्बल ३१७ विद्यार्थ्यांनी पाटोदा शहरातील संत बाळूदेव महाराज विद्यालयात ३१७ विद्यार्थ्यांनी बीटीएस परीक्षा दिली. या परीक्षेसाठी संत बाळूदेव महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंदांचे तसेच तालुकाभरातून आलेल्या शिक्षकांचे अनमोल सहकार्य मिळाले.



### विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वरूप माहित होते; चांगला प्रतिसाद

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार जीवनाभियोग शिक्षण देणारे पहिले पाऊल म्हणून बीटीएस ही परीक्षा घेण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ व्हावी यासाठी ही परीक्षा आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये राज्यस्तरीय जिल्हास्तरीय अशी बक्षिसे देण्यात येणार असून सध्याच्या स्पर्धा परीक्षांच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वरूप माहिती व्हावे याच उद्देशाने या परीक्षेचे आयोजन आपण करत आहोत पाटोदा तालुक्यात विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**-प्रा.सोमीनाथ खंडागळे, परीक्षा समन्वयक पाटोदा**

# सुलोचना बहीर यांचे निधन

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

**येथील माजी ग्रामपंचायत सदस्य सुलोचना माणिकराव बहीर यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्या ८१ वर्षाच्या होत्या.**



पत्रकार सतीश बहीर,बुलंद छावाचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल बहीर यांच्या मातोश्री सुलोचना माणिकराव बहीर यांचे रविवार दि. २९ रोजी सकाळी दुःखद निधन झाले त्यांच्यावर रविवारी सायंकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात मुलगी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# शिंपेगाव शिवारात दिव्यांग तरुणावर अमानुष हल्ला; आरोपींवर कठोर कारवाईची मागणी

**गेवराई । प्रतिनिधी**

**शेळ्या चारण्यासाठी शेतात गेलेल्या जन्मजात मुका-बहिरा दिव्यांग तरुणावर शेजाऱ्यांनी कुऱ्हाडीच्या दांड्याने, काठीने व दगडाने बेदम मारहाण करून गळा दाबल्याची संतापजनक घटना शिंपेगाव शिवारात घडली आहे. ''आज जिवंत सोडणार नाही'' अशी धमकी देत जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला असून, या प्रकारामुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

ही घटना दि. २६ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे साडेअकरा वाजता घडली. रामेश्वर बलभिम कोठेकर (वय २४, रा. शिंपेगाव, ता. गेवराई) हे आपल्या शेतात बाभळीच्या झाडाच्या फांद्या शेळ्यांसाठी तोडत असताना शेजारील ईटकुर येथील बाबासाहेब सखाराम मासाळ व चंदू सखाराम मासाळ यांनी त्यांच्यावर हल्ला केला. आरोपींनी कुऱ्हाडीचा दांडा, काठी व दगडाने मारहाण करत त्यांच्या हात, मांडी, पाय, नडगी व गुडघ्यावर गंभीर दुखापत केली. इतकेच नव्हे तर दोघांनी मिळून त्यांचा गळा दाबून जिवे मारण्याचाही प्रयत्न केल्याचा आरोप आहे. रामेश्वर हे जन्मतःच मुका व बहिरा असल्याचे माहिती असूनही आरोपींनी त्यांच्या अपंगत्वाचा गैरफायदा घेत अमानुष अत्याचार केल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. दरम्यान, चुलत पुतण्या ओम उर्फ श्रीकांत कोठेकर हा मदतीसाठी धावून आला असता, त्यालाही आरोपींनी ढकलून लाथा-बुक्क्यांनी मारहाण करत ''तुलाही मरायचे आहे का?'' अशी धमकी दिली. या घटनेनंतर रामेश्वर यांचा भाऊ परमेश्वर कोठेकर यांनी मादळमोही पोलीस चौकीत तक्रार दाखल केली. मात्र, पोलिसांनी या गंभीर प्रकरणात किरकोळ अदखलपात्र गुन्हा (एनसीआर क्र. २५६/२०२६) दाखल केल्याचा आरोप करण्यात येत आहे. तसेच, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत तरतुदींचा विचार न केल्याबाबतही नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान, परमेश्वर कोठेकर यांनी पोलीस अधीक्षक बीड, उपविभागीय अधिकारी गेवराई तसेच गेवराई पोलीस ठाणे प्रभारी यांच्याकडे लेखी तक्रार देऊन आरोपींवर भारतीय न्याय संहिता व दिव्यांग हक्क कायद्यान्वये गंभीर गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणात पोलिसांकडून पुढे कोणती कारवाई केली जाते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# घनसावंगी मतदारसंघातील कार्यकर्त्यांना बबनराव लोणीकरांचा 'बूस्टर डोस'




**घनसावंगी । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टीच्या वतीने मच्छिंद्रनाथ चिंचोली येथील संजीवन समाधी ध्यान योगपीठ केंद्रात आयोजित 'पंडित दीनदयाल उपाध्याय महाप्रशिक्षण अभियानाचा' मोठ्या उत्साहात समारोप झाला. या सोहळ्यात माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी कार्यकर्त्यांना आगामी काळातील रणनीती आणि कार्यपद्धतीबाबत सखोल मार्गदर्शन केले.**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित या दोन दिवसीय निवासी शिबिरात अंबड, घनसावंगी आणि जालना तालुक्यातील शेकडो कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. प्रशिक्षण सत्रांसोबतच योग अभ्यास आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांमुळे हे शिबिर अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले. रविवारी दुसऱ्या दिवसाच्या सत्रात भाजपा जिल्हाध्यक्ष नारायण कुचे यांनी मार्गदर्शन करताना 'मतदार यादी पुनरीक्षण' मोहिमेत सक्रीय होऊन याद्यांचे शुद्धीकरण करण्याचे आवाहन केले. घनसावंगी विधानसभा निवडणूक प्रमुख सतीश घाटगे यांनी केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती दिली. या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी कशा प्रकारे कार्य करावे, याबाबत त्यांनी मौलिक सूचना केल्या. पत्रकार सुरेश केसापूरकर यांनी 'वैचारिक अधिष्ठान' या विषयावर मार्मिक भाष्य केले. या कार्यक्रमास भाजप प्रदेश सचिव रेखाताई कुलकर्णी, सतीश घाटगे, विष्णुपंत जाधव, संजय तौर, शिवाजीराव बोबडे, अंकुशराव बोबडे, सर्जेराव जाधव, बाळासाहेब बोरकर, डॉ. रमेश तारगे, गोविंद ढेंबरे, शंकर लहामगे, जीवनराव वगरे, रमेश महाराज वाघ, संजय आटोळे यांच्यासह तिन्ही मंडळांतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांच्या कर्जमाफी

काही प्रमाणात विलंब होऊ शकतो. तरीही, सरकारकडून ''कमिटेड कर्जमाफी''चा शब्द देण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. एकूणच, कर्जमाफीची घोषणा ही दिलासादायक असली तरी तिची अंमलबजावणी, निकष आणि वेळापत्रक यावरच आता संपूर्ण लक्ष केंद्रित झाले असून, येत्या काही दिवसांत याबाबत अधिक स्पष्टता येण्याची शक्यता आहे.

----------

### ३० मार्च ते ४ एप्रिल दरम्यान

आहे. मात्र, या भागांमध्ये काही प्रमाणात अस्थिर हवामान आणि वादळी पाऊस पडू शकतो. त्यानंतर १ ते ४ एप्रिल दरम्यान वादळी पावसाचे प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे या कालावधीत मध्य महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील ठिकठिकाणी आभाळी हवामान, दुपारनंतरचा वादळी पाऊस, आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे, असेही आवाहन करण्यात येत आहे.

----------

### राष्ट्रवादीच्या दैवतांना डावलून स्वत:

म्हटले आहे की, ''ज्यांच्या नेतृत्वावर कार्यकर्त्यांचा विश्वास आहे, त्यांचाच फोटो हटवला जातोय, हे राष्ट्रवादीचा सर्वसामान्य कार्यकर्ता कधीही सहन करणार नाही. राष्ट्रवादीच्या दैवतांना डावलून स्वत: देव बनण्याचा कुणी प्रयत्न करू नये. महाराष्ट्र हे सहन करणार नाही.'' राष्ट्रवादी काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्यांना किंवा प्रमुखांना डावलले जात असल्याचे संकेत या पोस्टमधून त्यांनी दिले आहेत का, याची चर्चा आता रंगू लागली आहे. मिटकरींनी आपल्या पोस्टमध्ये केवळ नाराजीच व्यक्त केली नाही, तर थेट इशाराही दिला आहे. पक्षाच्या स्थापनेपासून ज्यांनी संघटना उभी केली, अशा दैवत मानल्या जाणाऱ्या नेत्यांना बाजूला सारून नवीन नेतृत्व स्वतःचीच प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न करत असल्याची कुजबुज सुरू झाली आहे.

-------

### तुळजाभवानी देवीचे

होणार आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी मानल्या जाणाऱ्या आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी या काळात राज्यासह देशभरातून लाखो भाविक तुळजापूरात दाखल होत असतात. यंदा सलग सुट्ट्या असल्याने भाविकांची संख्या अधिक वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन मंदिर संस्थानकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार ३१ मार्च रोजी मध्यरात्री १ वाजल्यापासून ते ५ एप्रिल रोजी रात्री ११ वाजेपर्यंत सर्व भाविकांना बीडकर पायऱ्यांमार्फत मंदिरात प्रवेश देण्यात येणार आहे.

------------

### ई-गव्हर्नन्समध्ये पर्यावरण विभाग

भोज यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत आम्ही नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा देण्यावर भर दिला. ई-ऑफिस, डॅशबोर्ड, पोर्टल एकात्मिकरण आणि नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे विभागाची कार्यक्षमता लक्षणीय वाढली आहे. पुढील काळातही डिजिटल सेवा अधिक सक्षम करण्यावर आमचा भर राहील. विभागाच्या कामकाजात गती आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा अजित पवार तसेच विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. १५० दिवसांच्या ई गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने डिजिटल सेवा, पारदर्शकता आणि नागरिकाभिमुख उपक्रमांवर विशेष भर दिला. विभागाच्या संकेतस्थळावर सुमारे ३,००० नागरिक दररोज भेट देत असून ते दिव्यांगांसाठी सुलभ (२.१) आणि सायबर सुरक्षिततेच्या निकषांनुसार विकसित करण्यात आले आहेत. 'आपले सरकार' पोर्टलवर विभागाच्या सर्व ७ सेवा पूर्णपणे ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच मैत्री, ईसीएमपीसीबी आणि इतर पोर्टलशी एकात्मिक व्यवस्था तयार करण्यात आली असून नागरिकांना एकाच ठिकाणी विविध सेवा मिळू लागल्या आहेत. ई-ऑफिस प्रणालीमुळे कामकाजाला गती मिळाली असून मे २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत सुमारे ५,४५० फाईल्स निकाली काढण्यात आल्या आहेत. सरासरी ७ दिवसांत फाईल निपटारा होत असल्याने प्रशासन अधिक कार्यक्षम झाले आहे. तक्रार निवारण यंत्रणेतही सुधारणा करण्यात आली असून बहुतांश तक्रारी ७ ते १५ दिवसांत निकाली काढल्या जात आहेत. तसेच डॅशबोर्ड प्रणालीमुळे कामकाजाचे रिअल-टाईम निरीक्षण शक्य झाले आहे.ङ्कङ्कयाशिवाय, व्हॉट्सॲप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून सेवा अधिक सोप्या आणि पारदर्शक करण्याचा प्रयत्न सुरू आहे. बांधकाम व पाडकाम कचरा परवानगी सेवा व्हॉट्सॲपद्वारे देण्याचा अभिनव उपक्रमही राबविण्यात येत आहे. या यशामुळे पर्यावरण विभागाच्या डिजिटल परिवर्तनाच्या प्रयत्नांना नवी दिशा मिळाली असून नागरिकांना अधिक प्रभावी सेवा देण्यास मदत होणार आहे. या यशामुळे पर्यावरण विभागाच्या डिजिटल परिवर्तनाच्या प्रयत्नांना नवी दिशा मिळाली असून नागरिकांना अधिक प्रभावी सेवा देण्यास मदत होणार आहे.

----------

### औषधांच्या किमतीही

वाढ झाली आहे. यामुळे इंजेक्शनच्या सिरिंज, आयव्ही बाटल्या, डायग्नोस्टिक किट आणि औषधांचे पॅकेजिंग, सर्जिकल हातमोजे यांच्या किमती एप्रिल महिन्यापासून वाढू शकतात. तज्ज्ञांच्या मते, कंपन्या अचानक किमती वाढवण्याऐवजी उत्पादनाचे वजन किंवा आकार कमी करू शकतात. उदाहरणार्थ, १० रुपयांच्या बिस्किट पुड्याची किंमत तीच ठेवून त्यातील बिस्किटांची संख्या कमी केली जाऊ शकते.

-------------

### राजकारण करू नका भारताचे

मनापासून आभारी आहे, जे तेथील १ कोटींहून अधिक भारतीयांना सर्व प्रकारची मदत पुरवत आहेत, असेही त्यांनी यावेळी म्हटले. ते म्हणाले की, निश्चितच आव्हानात्मक काळ आहे. मी माझ्या सर्व देशवासियांना पुन्हा एकदा आवाहन करतो की, आपण सर्वांनी एकजुटीने या आव्हानावर मात केली पाहिजे. जे या मुद्द्याचेही राजकारण करत आहेत, त्यांनी तसे करणे टाळावे. हा १४० कोटी देशवासियांच्या हिताचा विषय आहे; येथे स्वार्थी राजकारणाला जागा नाही. त्यामुळे, जे अफवा पसरवत आहेत ते देशाचे मोठे नुकसान करत आहेत, असेही यावेळी त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, मी सर्व नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि अफवांना बळी न पडण्याचे आवाहन करतो. केवळ सरकारकडून मिळणाऱ्या सातत्यपूर्ण माहितीवर विश्वास ठेवा आणि त्यानुसारच कारवाई करा. आपल्या भाषणादरम्यान, पंतप्रधान मोदी म्हणाले की देशभरात विविध स्वरूपात राष्ट्रउभारणीच्या उद्देशाने राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचीही दखल घेतली. असाच एक उपक्रम म्हणजे 'ज्ञान भारतम सर्वेक्षण', ज्याचा उद्देश देशभरातील हस्तलिखितांविषयी माहिती गोळा करणे हा असल्याचेही यावेळी सांगितले.

-------------

### आष्टीचे उपअभियंता

देण्यात आले. याप्रकरणी स्वयंस्पष्ट आणि सत्य अहवाल देण्याचे आदेश दिले. चौकशी अहवालात सदर सादर केलेल्या देयकाचे कामच झाले नाही असा स्पष्ट अहवाल चौकशी अंतिम समोर आला यामुळे बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ निलंबनाची संचिका सादर करण्याचे आदेश दिले मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी दिनांक २८ मार्च रोजी संबंधित प्रभारी उपअभियंता असलेल्या मधुकर निंबाळकर यांना तात्काळ निलंबित केले आहे. मार्च अखेर अर्धवट कामे कामांची बिले काढण्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत. परंतु चक्क उपअभियंता यांनी बोगस देयक सादर केल्यामुळे निंबाळकर यांना निलंबनाला सामोरे जावे लागले. या प्रकरणात आणखी किती जणांचा सहभाग आहे? याची चौकशी सुरू आहे. या प्रकरणात कोणावर कारवाई होते? याकडे लक्ष लागले आहे.

**अर्धवट कामाचे बिले तपासणार**

दरम्यान जिल्हा परिषदेच्या विविध कामे तपासूनच देयके काढण्यात येणार आहेत. अर्धवट कामाची देयके दिले जाणार नाहीत अशी माहिती वरिष्ठ अधिकारी यांनी दिली. मार्च अखेर अर्धवट आणि बोगस बिले काढण्याचे यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाच्या बांधकाम विभागात प्रकार घडले आहेत. जिल्हा परिषदेचे सीईओ रहमान यांनी सदर कारवाई केल्याने अधिकारी आणि कर्मचाऱ्याचे धाबे दणाणले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. ३० मार्च २०२६
३

## थोडक्यात



### उत्कृष्ट अंगणवाडीताई म्हणून पंचफुला पास्टे यांचा सत्कार

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोठेवाडी येथील अंगणवाडी सेविका पंचफूला पास्टे यांना जागतिक महिला दिनानिमित्त बीड येथे उत्कृष्ट अंगणवाडी ताई म्हणून पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्काराबद्दल गंगामसला परिसरातील अंगणवाडी सेविका,मदतनीस यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी माजलगांव बालविकास प्रकल्प अधिकारी के.आर. ढोले,अंगणवाडी प्रवेक्षिका वैशाली रत्नपारखी,गंगामसला,मोठेवाडी व परिसरातील अंगणवाडी सेविका मदतनीस यांची मोठी उपस्थिती होती.

### महावीर जयंतीनिमित्त आज प्रा.यजुर्वेद महाजन यांचे व्याख्यान

आष्टी । प्रतिनिधी


दीपस्तंभ फाउंडेशन मनोबलचे प्रा. यजुर्वेंद्र महाजन यांचे आज आष्टी येथे भगवान महावीर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त जिंदगी ना मिलेगी दोबारा या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.



भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त सालाबादप्रमाणे याही वर्षी जैन समाजाच्या वतीने आष्टी शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये आज सोमवार दि.३० रोजी जळगावचे एक थोर समाजसेवक आणि शिक्षणतज्ज्ञ प्रा.यजुर्वेंद्र महाजन ज्यांनी दीपस्तंभ फाउंडेशनच्या माध्यमातून अनाथ,अपंग (दिव्यांग), आदिवासी आणि निराधार मुलांच्या शिक्षणासाठी व संगोपनासाठी मोठे कार्य केले आहे तसेच स्वामी विवेकानंदांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, निवास आणि कौशल्याधिष्ठित शिक्षणाद्वारे हजारो विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवले आहे.शहरातील आनंदऋषिजी चौक कापडबाजार येथे आज रात्री ८ ते १० या वेळेत होणाऱ्या व्याख्यानमालेचा लाभ आष्टीकरांनी घेण्याचे आवाहन सकल जैन समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले आहे.

### सदाशिव नाईक यांना मातृशोक

बीड । प्रतिनिधी



चिंचाळा ता वडवणी येथील सौ. उषा जीवनराव नाईक वय (७२) यांचे दिर्घ आजाराने रविवार दि. २९ रोजी माजलगाव येथे उपचार सुरू असताना निधन झाले. पत्रकार सदाशिव नाईक यांच्या त्या आई आहेत.

त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नाईक परिवारावर कोसळलेल्या दुःखात राज्य लोकतंत्र सहभागी आहोत.

## महावितरणने नियमितपणे ग्राहकांना बिले द्यावीत ; अन्यथा अंबाजोगाईकर वीज बिले भरणार नाहीत - डॉ.इंगोले यांचा इशारा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महावितरण द्वारे अंबाजोगाई मध्ये विद्युत ग्राहकांकडून सक्तीने विज बिल वसुली सुरू आहे. वीज बिले न भरल्यास विद्युत ग्राहकांचे वीज कनेक्शन बंद करून त्यांना अंधारात ठेवण्यात येत आहे. वरवर पहाता ही कृती जरी नियमात बसणारी वाटत असली तरी सुद्धा अंबाजोगाई मध्ये ७० टक्के विद्युत ग्राहकांना नियमित बिले मिळत नसल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. त्यामुळे महावितरणने नियमितपणे ग्राहकांना बिले द्यावीत ; अन्यथा अंबाजोगाईकर वीज बिले भरणार नाहीत असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे नेते डॉ.राजेश इंगोले यांनी दिला आहे.



या संदर्भात जनतेला जाहीर आवाहन करताना व आमच्या प्रतिनिधीशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे नेते डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले आहे की, महावितरणची ही विद्युत बिले देण्याबाबतची अनियमितता ही बेकायदेशीर व नियमबाह्य आहे. त्यामुळे वाढीव बिलांवरील सक्तीची वसुली ही चुकीची आहे. विद्युत ग्राहकांना वीज बिले प्रत्येकमहिन्याच्या महिन्याला न दिल्यामुळे एकदाच चार ते पाच महिन्यांची बिले देण्यात आली आहेत. कुणाकुणाला तर तब्बल एक-एक वर्षाची बिले देण्यात आलेली आहेत. त्यामुळे सदरील वीज वापराचे युनिट्स अनेक पटीने वाढवून त्या युनिट वापराच्या हिशोबाने वाढीव दराने वीज बिल ग्राहकांच्या माथी मारण्यात आले आहेत. असे अनेक प्रकार अंबाजोगाई मध्ये घडले आहेत. या सर्व प्रकरणांची रितसर चौकशी करून वाढीव विद्युत बिले आलेल्या ग्राहकांना ही बिले तात्काळ कमी करून त्यांना योग्य ती बिले द्यावी अन्यथा महावितरण विज मंडळाच्या विरूद्ध विद्युत ग्राहकांचे आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा अंबाजोगाईचे सामाजिक कार्यकर्ते तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी महावितरणला दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे. नियमितपणे विद्युत बिले देणे हे महावितरणचे कर्तव्य आहे व वीज ग्राहकांचा अधिकार देखील आहे. महावितरणच्या बिल दिरंगाईमुळे अनेक विद्युत ग्राहकांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, तसेच वीज पुरवठा खंडित केल्यामुळे नाहक मनस्ताप होत आहे. त्यामुळे महावितरणच्या मुख्यअभियंत्यांनी या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. महावितरणच्या मुख्य अभियंत्यांनी तात्काळ या प्रकरणी तातडीची बैठक बोलावून यावर आवश्यक ती कार्यवाही करणे ग्राहकांचे हित जोपासण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.त्यामुळे त्यांनी विभागाची तातडीची बैठक बोलवावी अशी आग्रही भूमिका डॉ.इंगोले यांनी यावेळी घेतली. दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात इंगोले यांनी अंबाजोगाईतील अनेक मान्यवर प्रतिष्ठितांनी, दुकानदारांनी महावितरणच्या या भोंगळ कारभाराविषयी माझ्याकडे दूरध्वनी द्वारे तक्रारी केल्या आहेत. त्यापैकी अनेक तक्रारी मी वैयक्तिक पातळीवर वीज कर्मचाऱ्यांशी बोलून सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, दिवसेंदिवस या तक्रारी वाढतच आहेत. त्यामुळे याप्रकरणी धोरणात्मक निर्णय महावितरण वीज मंडळाने घेणे आवश्यक असल्याचे मत डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केले. येणाऱ्या काही दिवसात जर या प्रकरणांचा निपटारा महावितरण द्वारे झाला नाही तर याप्रकरणी ग्राहक मंचात तक्रार करण्यातच येईल. परंतु, विद्युत ग्राहकांचे एक जनआंदोलन उभा करण्यात येईल असा इशारा डॉ.राजेश इंगोले यांनी महावितरणला दिलेल्या निवेदनातून केला आहे.

## महाराष्ट्राच्या विकासाला अडथळे आले असून अंधारयुगाकडे वाटचाल सुरु - प्रा. सुशीलाताई मोराळे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र सर्वाधिक कर वसूल करणारे राज्य आहे परंतु ६० हजार कोटीचा वार्षिक व्याजाच्या बोज्यात अडकले आहे. राष्ट्राच्या एकूण जीडीपी मध्ये राज्याचे १४ टक्के योगदान आहे. मात्र ९.३२ लाख कर्जाचा बोजा राज्यावर आहे. निवडणूक काळात मतासाठी घेतलेले सवंग निर्णय पुढील पिढ्यांच्या खांद्यावर कर्जाचे ओझे वाढवीत आहे. एका अर्थाने लोकशाहीची ही कसोटी आहे. ही परिस्थिती देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि दिवंगत नेते अजित दादांच्या थेट घेतलेल्या निर्णयाचा निष्कर्ष आहे अशी प्रतिक्रिया प्रा. मोराळे ताई यांनी दिली आहे. कोविडच्या सुरुवातीला हे कर्ज ५.१९ लाख कोटी इतके होते नंतर २०२१ - २२ मध्ये हे कर्ज ५.७६ लाख कोटी, २०२२ - २३ मध्ये ६.२९ लाख कोटी, २०२३- २४ मध्ये ७.११ लाख कोटी, २०२४ - २५ मध्ये ८.३९ लाख कोटी, २०२५- २०२६ मध्ये ९.३२ लाख कोटी इथपर्यंत येऊन ही वाढ पोहोचली देशाची राजधानी म्हणून मुंबईचा उदो उदो केला जातो परंतु देशाच्या आर्थिक राजधानीवर कर्जाचा डोंगर उभा राहत आहे.

सरकार कर्ज घेण्यातच धन्यता मानीत आहे. २०१९-२०२० मध्ये व्याजाचा खर्च ३२ हजार कोटी होता, २०२१- २०२२ मध्ये ४० हजार कोटी, २०२३-२०२४ मध्ये ४८ हजार कोटी, २०२४-२०२५ मध्ये ५५ हजार कोटी, तर २०२५-२०२६ मध्ये ६० हजार कोटी पेक्षा जास्त व्याजावर सरकार खर्च करीत आहे. रस्ते, शाळा, रुग्णालय सिंचन प्रकल्प किंवा रोजगार निर्मिती पेक्षा कर्जाचे व्याज भरण्यासाठीच खर्च होत आहे सरकार डबल इंजिनचा उल्लेख करते मात्र राज्याला पुढे नेण्याऐवजी कर्जाच्या खाईतच राज्याला टाकीत आहे सरकारने लाडकी बहीण योजना निवडणूक जिंकण्यासाठी क्रियान्वीत केली मात्र भाषणात म्हणतात सक्षमीकरणासाठी आहे दोन हजार रुपयाने कोणते सक्षमीकरण महिलांचे होणार आहे हा प्रश्न आहे. २०२४-२०२५ आणि २०२५-२०२६ या अंदाजपत्रकात महसुली खर्च झपाट्याने वाढताना दिसत आहे महिलांचे सक्षमीकरण व्हायलाच हवे पण हे सक्षमीकरण करण्यासाठी शाळा, महाविद्यालये, कौशल्य विकास केंद्रे, आरोग्य सेवा सुरक्षित सार्वजनिक वाहतूक रोजगार निर्मिती गुंतवणूक अपेक्षित आहे मात्र असे होत नाही. २०२०-२०२१ मध्ये महसुली खर्च ३.७ लाख कोटी होता.२०२५-२०२६ मध्ये ०.८० लाख कोटी इतका वाढला आहे. याउलट भांडवली गुंतवणूक मंदावलेली आहे त्यामुळे सामाजिक स्थैर्याचा धोका निर्माण झाला आहे. सामाजिक न्याय हा खर्च नसून गुंतवणूक आहे हे तत्व दुर्लक्षित असल्यामुळे असमानता वाढत आहे. सामाजिक स्थैर्य ढासळत आहे. सरकारने निवडणूक जिंकण्यासाठी कर्ज काढायचे थांबवावे कर्ज काढून लोकप्रिय घोषणा करून निवडणूक जिंकता येईल पण महाराष्ट्राला फार मोठी किंमत मोजावी लागेल हे डबल इंजिन सरकारने ध्यानात घ्यावे असे आव्हान लोकनेत्या प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे.

### मुरलीधर नागरगोजे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



गेवराई तालुक्यातील शेकटा येथील रहिवाशी मुरलीधर गोविंद नागरगोजे यांचे रविवार दि. २९ मार्च रोजी सकाळी १० वाजेच्या दरम्यान निधन झाले. मृत्यू समयी ते ८० वर्षाचे होते. गावातीलच स्मशानभूमित त्यांच्यावर दुपारी १ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुली, एक मुलगा सुन नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## पान ६ वरुन...

### सातबारावर नाव असताना

कारवाई करण्यात यावी तसेच मोजणी करताना संबंधित सर्व्हे नंबर मधील धारकांना नोटीस देणे बंधनकारक असतानाही पाटोदा सर्व्हे नंबर ७१५ ची मोजणी दिनांक ३०/३/२०२६ रोजी करण्याची उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय पाटोदा यांनी नोटीस काढली परंतु त्या सर्व्हे नंबर मध्ये मी धारक असताना मला साधी नोटीस दीली नाही नोटीस न देण्याचं गौडबंगाल काय आहे,या मध्ये संबंधितांना कोणाकडून काही आर्थिक देवाणघेवाण झाली आहे काय याची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी प्रतिक्रिया सोमीनाथ कोल्हे यांनी दिली.

### वस्ताद अनिकेत गोरे याने मारले

अयान शेख, सुरेश खांडेकर आदी नव्यादमाच्या मल्लांनी प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या कुस्त्या केल्या. पंच म्हणून लक्ष्मण करे, शिवाजी बाप्पा साबळे, बाबुराव शिंदे, माऊली गोरे, रावसाहेब अब्दागिरे, गोरख जाधव, अशोक खांडेकर, रावसाहेब तिडके, हनुमंत मुंडे, काशिनाथ साबळे, केशव साबळे, राम साबळे,ज्ञानेश्वर मिसाळ आदींनी काम पाहिले.

आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांची यावेळी उपस्थिती होती. बजरंग बली कुस्ती संकुलच्या वतीने डॉ. शेटे यांचा कुस्तीचे प्रतीक समजली जाणारी मानाची गदा देऊन माऊली गोरे यांनी सत्कार केला. त्यांनी जमिनीवर बसून या लाल मातीतील मर्दानी खेळाचा आनंद घेतला. यावेळी उद्योजक प्रदीप ठोंबरे, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर, सुग्रीव कराड, शहाजी सोळंके, अर्जुन मोरे, हनुमंत भोसले वस्ताद , महेबुब पहेलवान, आदींची उपस्थिती होती. मैदानाचे बहारदार सूत्रसंचालन महादेव मुजमुले यांनी केले. समस्त गावकऱ्यांच्या वतीने लोकवर्गणी करून मैदान भरवण्यात आले होते. सरपंच त्रिंबक साबळे यांनी गावकऱ्यांच्या वतीने सर्वांचे आभार मानले.

### राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद

तालुक्यातील आणि बीड जिल्ह्यातील महिलांनी केली आहे. संगीताताई चव्हाण या शिवसेनेच्या नेत्या आहेत, त्यामुळे महिला आयोगाचे पद हे नेमके कोणाच्या वाट्याला जाते, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. दरम्यान, संगीताताई चव्हाण यांची निवड व्हावी यासाठी गावागावातील कार्यकर्त्यांनी मागणीचा जोर लावला आहे.

बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी बॅनर लावून मागणी

संगीताताई चव्हाण यांची महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड करावी, या मागणीचे फलक बीड शहर आणि जिल्ह्याच्या विविध कानाकोपऱ्यात रस्त्याच्या कडेला, चौकाचौकात लावलेले दिसून येत आहेत. हे फलक बीड जिल्ह्यातील लाडक्या बहिणींनी लावले असल्याचे सांगण्यात येत आहे. बीड जिल्ह्यातील युवा कार्यकर्ते तुकाराम गायकवाड, शेख समीर, बाबासाहेब राऊत, माजी सरपंच मिलु भाई, अशोक आडे, शेख फर्जना, प्रतिभा गणोरकर, शीला शिरसाट, रेखा भालशंकर, सुनिता जाधव, पूजा धोंडे, शीला सावंत, शांता राठोड, रेखा वाघमारे, यशोदा राठोड, मंगल राठोड, मीरा आडे, संजीवनी आडे, मनीषा पवार, कांचन गनोरकर, कांचन मोरे, नुजत काजी, मधुमती शेजुळ, शारदा डोईजड, जया राऊत आदी कार्यकर्त्यांनी मागणी लावून धरली आहे

### पक्ष विस्तार व बळकटीसाठी

यावेळी जीवनराव गोरे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पक्षाचे विचार, धोरणे आणि भूमिका समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे ही प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी आहे. सातत्यपूर्ण लोकसंपर्क ठेवत जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम केल्यास पक्षाची विश्वासार्हता अधिक दृढ होईल.बैठकीत कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले. सर्वांनी एकजुटीने काम करून पक्ष अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच प्रत्येक तालुक्यात संघटन विस्तारासाठी विशेष अभियान राबवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, युवक व महिला आघाड्यांना अधिक सक्रिय करण्यावर भर देण्यात येणार आहे.एकूणच, ही बैठक आगामी निवडणुकांच्या दृष्टीने दिशा ठरवणारी ठरली असून, राष्ट्रवादी काँग्रेस ( शरदचंद्र पवार ) पक्षाने बीड जिल्ह्यात आपली ताकद वाढवण्याचा स्पष्ट संकल्प केला आहे.

## अंबाजोगाईत महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी आणि कमल खुरसाळे स्मृती न्यास यांच्या वतीने ०१ मे ते ०८ मे २०२६ दरम्यान महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे आयोजन गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयात करण्यात आले असल्याची माहिती योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर यांनी दिली. शिबीर आयोजन बैठकीत बोलताना

चंद्रशेखर बर्दापुरकर म्हणाले की,महिला सबलीकरण व सक्षमीकरण या उद्देशातून योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने सन. २०१० पासून महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे आयोजन होते. या शिबीरात इयत्ता आठवी व त्यानंतरच्या मुलींना योगासन ,तायक्कांदो, प्राणायाम,ज्युदो,कराटे, लाठी काठी,नेमबाजी, आणि तलवार बाजीचे प्रशिक्षण देण्यात येणार असून शिवाय

सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत मान्यवरांची स्फूर्तीदायी व्याख्यानेही होणार आहेत युवतींच्या व्यक्तीमत्व विकासाला हे शिबीर पोषक ठरेल याचे महत्व जाणून अधिकाधिक युवतींना शिबीरात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करावे असेही ते म्हणाले.

शिबिराच्या नोंदणीसाठी क्रिडा शिक्षिका ए.यु.रेवडकर मो.नं.८८३०८६१००४ यांच्याशी संपर्क साधावा असेही सूचित करण्यात आले आहे. यावेळी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, सहसचिव प्रा.डॉ.भीमाशंकर शेटे, जेष्ठ सल्लागार एम. एस.लोमटे, संचालक डॉ.जे.बी. मोटेगांवकर, ॲड.के.जे. विर्धे, आर. व्ही.सोनवळकर, डॉ. गणेश पिंगळे तसेच संस्थेच्या विविध विभागांचे प्रमुख, शिक्षिका, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

## खडतर काळात टिकायचे असेल तर धर्मकार्याशिवाय पर्याय नाही -घोडके महाराज

बीड । प्रतिनिधी

राधाकृष्णनगरी येथील हरिनाम सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशीच्या आपल्या कीर्तनात भक्ती दास महाराज घोडके यांनी जगद्गुरु तुकाराम महाराजांचा अभंग घेत असताना ईश्वरा प्रति निस्वार्थ भावना केलेली भक्ती हाच खरा जीवनाचा पाया खडतर काळात उमेदीने यश मिळवण्यासाठी मनातून धर्मकार्य केलं पाहिजे म्हणून त्यांनी पुढील अभंगासह आपल्या कीर्तनातून प्रबोधन केले



वीर विठ्ठलाचे गाढे,
कळिकाळ पायां पडे

या अभंगातून विठ्ठल भक्तांची महती संत तुकाराम महाराज अतिशय सुंदर रीतीने सांगतात.

ज्या भक्तांच्या मनामध्ये विठ्ठलावर अखंड श्रद्धा आणि प्रेम असते, ते खऱ्या अर्थाने 'वीर' असतात. कारण ते संसारातील मोह, माया, वाईट प्रवृत्ती आणि कळिकाळावर विजय मिळवतात. त्यामुळेच कळिकाळही त्यांच्या चरणी नतमस्तक होतो.

करिती घोष जयजयकार, जळती दोषांचे डोंगर

जेव्हा भक्त नामस्मरण करतो, भजन-कीर्तन करतो, तेव्हा त्याच्या जीवनातील पाप, दोष, दुर्गुण हे जणू काही जळून भस्म होतात. नामाचा जयजयकार म्हणजे आत्मशुद्धीचा मार्ग आहे.

क्षमा, दया, शांती - बाण अभंग हे हाती

भक्ताच्या हातात कोणते शस्त्र असते? तर क्षमा, दया आणि शांती हीच त्याची खरी शक्ती आहे. हे गुण ज्याच्या जीवनात आहेत, तोच खरा विठ्ठलभक्त.

तुका म्हणे बळी, तेचि एक भू मंडळी

तुकाराम महाराज म्हणतात - या पृथ्वीवर खरे सामर्थ्यवान, खरे श्रेष्ठ कोण आहेत? तर हेच विठ्ठलाचे भक्त! यावेळी राधाकृष्णनगरी जिजाऊ सृष्टी रेणुका नगरी सह परिसरातील हजारो माता माउल्या व भक्तगण कीर्तनासाठी उपस्थित होते

## धनसंपत्तीपेक्षा संतसंग श्रेष्ठ असून त्यातूनच खरा आनंद मिळतो-शिवदास महाराज जगले

### धुनकवाडमध्ये शिवदास महाराजांची कीर्तन सेवा

**वडवणी । प्रतिनिधी**

धुनकवाड येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या सहाव्या दिवशीची कीर्तन सेवा विनोदाचार्य ह.भ.प. शिवदास महाराज जंगले (मोठेवाडी) यांच्या सुश्राव्य वाणीत भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाली. या कीर्तनासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून अध्यात्मिक वातावरणाचा लाभ घेतला.




कीर्तनादरम्यान मार्गदर्शन करताना शिवदास महाराज जंगले म्हणाले की, धनसंपत्तीपेक्षा संतसंग श्रेष्ठ असून त्यातूनच खरा आनंद मिळतो.जीवनात भौतिक सुखांपेक्षा अध्यात्मिक समाधान अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.छोट्या माणसाचा विचार करणाराच खऱ्या अर्थाने सर्वात मोठा असतो असे सांगत त्यांनी सामाजिक जाणीवेचा संदेश दिला.

तसेच ज्ञानेश्वर महाराज यांचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, ज्ञानेश्वर महाराज शरीराने पुरुष असले तरी त्यांचे हृदय आईसारखे करुणामय होते. प्रत्येकाने ज्ञानेश्वरीचे पारायण करून जीवनात योग्य दृष्टीकोन आत्मसात करावा असे आवाहन त्यांनी केले. ज्ञानेश्वरीमध्ये केवळ गणिती संकल्पना नाहीत तर जीवन जगण्याचा दृष्टीकोन दिला आहे. साधूंचा महिमा सर्वांना सहज कळत नाही मात्र संत हे नेहमी समाजाच्या आणि संपूर्ण जगाच्या कल्याणाचा विचार करणारे असतात असेही ते म्हणाले.

यावेळी त्यांनी संत तुकाराम महाराज यांच्या प्रसिद्ध

''हेचि दान देगा देवा तुझा विसर न व्हावा''.या अभंगावर चिंतन केले.

या अभंगातून संत तुकारामांनी अखंड देवस्मरण, देवाच्या गुणांचे गान आणि संतसंगाचे महत्त्व अधोरेखित केले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मनुष्याने सतत देवाचे स्मरण ठेवत संतांच्या सहवासात राहिले तरच जीवनाला खरी दिशा आणि समाधान मिळते असा संदेश त्यांनी दिला.

या कीर्तनातून उपस्थित भाविकांना मोलाचे अध्यात्मिक मार्गदर्शन लाभले असून संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

यावेळी पंचक्रोशीतील भाविक-भक्त, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिण्याच्या आणि शेतीच्या पाणी प्रश्नावर मात करण्याचा प्रयत्न-सावे

संभाजीनगर : वॉटर ग्रिड प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांचा पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्नावर मात करण्याचा आम्ही प्रयत्न करीत, असल्याचे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांनी केले.

मराठवाडा विभागाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक आव्हाने आणि सामाजिक-राजकीय वास्तवाचा सखोल अभ्यास करून या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासासाठी एक व्यापक 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार करण्याच्या उद्देशाने महात्मा गांधी मिशन विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या दोनदिवसीय राष्ट्रीय गोलमेज परिषदेचे उद्घाटन झाले. त्या वेळी श्री. सावे बोलत होते. 'मराठवाड्याच्या भविष्याची पुनर्कल्पना' हा या परिषदेचा मुख्य विषय आहे. एमजीएम विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस आणि कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने, फॅकल्टी ऑफ इंटरडिसिप्लिनरी स्टडीजच्या सहकार्याने ही परिषद घेतली आहे.




या वेळी ज्येष्ठ पत्रकार पी. साईनाथ, द हिंदू बिझनेस लाइनचे डॉ. राधेश्याम जाधव, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अर्थतज्ज्ञ प्रा. एच. एम. देसरडा, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई, संचालक प्रा. डॉ. रमेश जारे, संचालक डॉ. के. पी. सिंग, डॉ. ह. नि. सोनकांबळे आदी उपस्थित होते. श्री सावे म्हणाले, की मराठवाड्यात हजारो कोटींची गुंतवणूक होत आहे. पुढच्या पाच वर्षात छत्रपती संभाजीनगर हे जगभरात ईव्ही हब म्हणून ओळखले जाईल. अपारंपारिक ऊर्जा खातेही आपल्याकडेच असून खात्याच्या माध्यमातून जानेवारी महिन्यात राज्यात कुसुम योजेनेतून ४५ हजार सोलार पंप इन्स्टॉल केले. याची नोंद गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झालेली आहे. महाराष्ट्रात साडेसात लक्ष सोलार पंप बसवले असून यातील १ लाख ८० हजार सोलार पंप हे फक्त मराठवाड्यात बसवले आहेत. समृद्धी महामार्गाच्या माध्यमातून या भागातील उद्योजक आणि शेतकरी यांना फायदा होत आहे. या परिषदेत चर्चेच्या माध्यमातून जे काही उपाय विकासासाठी पुढे येतील ते सरकारच्या दरबारात ठेवू,असेही श्री सावे म्हणाले. डॉ. जाधव, कुलगुरू प्रा. डॉ. सपकाळ यांनीही विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. ह. नि. सोनकांबळे, सूत्रसंचालन डॉ. वर्षा दांडगे तर आभार संचालक डॉ. के. पी. सिंग यांनी मानले.

# शेतकऱ्यांना दिलासा; ज्वारी, मका, बाजरी खरेदीसाठी तारीख जाहीर



पुणे / प्रतिनिधी

रब्बी हंगामातील ज्वारी, मका आणि इतर भरडधान्य उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत राज्य शासनाने हमीभावाने खरेदी जाहीर केली आहे.

या अंतर्गत १ मे ते ३० जूनदरम्यान प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया राबविण्यात येणार असून, त्यासाठी १ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत ऑनलाइन नोंदणी करणे शेतकऱ्यांसाठी अनिवार्य करण्यात आले आहे. यंदा शासनाने मका, ज्वारी, बाजरी आणि रागी (नाचणी) या भरडधान्यांच्या खरेदीवर विशेष भर दिला आहे. उत्पादनाला योग्य दर मिळावा आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टळावे, यासाठी खरेदीची ठोस उद्दिष्टेही निश्चित करण्यात आली आहेत. शेतकऱ्यांनी आपल्या उत्पादनाची विक्री करण्यासाठी बीईएएम पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करणे बंधनकारक आहे. १ ते ३० एप्रिल या कालावधीत नोंदणी पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांनाच खरेदीसाठी निश्चित वेळापत्रकानुसार बोलावले जाणार आहे. शासनाने स्पष्ट केले आहे की, ऑफलाइन पद्धतीने खरेदी केली जाणार नाही. राज्यात १ मे ते ३० जून या दोन महिन्यांच्या कालावधीत खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यंदाच्या हंगामासाठी खालीलप्रमाणे खरेदी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. हमीभावाने खरेदीमुळे बाजारातील चढ-उतारांचा फटका कमी होणार असून शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य दर मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी वेळेत ऑनलाइन नोंदणी करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. ऑनलाइन नोंदणी अनिवार्य केल्यामुळे खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता येणार असून नियोजनबद्ध पद्धतीने धान्य खरेदी होणार असल्याचेही सांगण्यात येत आहे.

# शेळ्यांचे वजन कमी होण्याची कारणे आणि त्यावर उपाय!

शेळीपालन व्यवसायाचा विचार केला तर प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी शेळ्यांचे पालन केले जाते. परंतु शेळ्यापासून मिळणारे मांस उत्पादन हे शेळ्यांच्या वजनावर अवलंबून असते. परंतु बऱ्याचदा काही कारणांमुळे शेळ्यांचे वजन कमी होते किंवा वाढत नाही व त्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांना फार मोठा आर्थिक फटका बसू शकतो.

शेळ्यांचे वजन कमी होण्याचे कारणे :

शेळ्यांमध्ये बऱ्याच प्रकारचे रोग उद्भवतात व त्यामुळे वजनावर विपरीत परिणाम होतो. दुसरे कारण म्हणजे जेव्हा कळपात शेळ्या राहतात तेव्हा चाऱ्यासाठी एकमेकांमध्ये स्पर्धा निर्माण होते, ही बाब देखील शेळ्यांच्या शरीराचे वजन कमी करण्यास कारणीभूत आहे. कळपामध्ये ज्या शेळ्या थोड्या दुर्बल किंवा विनम्र असतात अशा शेळ्यांचे वजन कमी होते. साहाजिकच कळपातील मजबूत आणि मोठ्या शेळ्या कमकुवत शेळ्यांच्या अन्न आणि जागेवर अधिकचा हक्क सांगतात व आहारात प्रवेश नाकारला जात असल्याने कमकुवत शेळ्यांना चारा व्यवस्थित मिळत नाही व शेळ्यांचे वजन घटते. या समस्येवर उपाय म्हणून शेळ्यांचे व तसेच त्यांच्या जाती व शारीरिक स्थितीनुसार त्यांचे वर्गीकरण करणे नेहमीच योग्य असते. जर शेळ्यांमध्ये दातांची समस्या असेल तर यामुळे देखील वजन कमी होऊ शकते. दातांच्या समस्यांमुळे चारा खाण्याच्या आणि गिळण्याच्या सामान्य प्रक्रियेवर विपरीत परिणाम होतो. यामुळे शेळ्यांना पुरेशा चाऱ्यापासून वंचित राहावे लागते. हार्ड स्टेनिंग हार्ड ड्राफ्टिंग, जबडा सुजणे हे देखील वजन कमी होण्याची प्रमुख कारणे आहेत. काही सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता जसे कॉपर, कोबाल्ट आणि सेलेनियम या आवश्यक सूक्ष्म पोषक घटकांच्या कमतरतेमुळे किंवा असंतुलनामुळे देखील शेळ्यांमध्ये वजन कमी होऊ शकते. कोबाल्टची कमतरता असली तर शरीराच्या वजनात वाढ होणे थांबते. सेलेनियम हे मेंढी पालन आणि शेळीपालन मध्ये एक महत्त्वाचा घटक आहे. याच्या कमतरतेमुळे मादी प्राण्यांमध्ये गर्भपात आणि प्रजनन संस्थेचे समस्या वाढते. याच्या कमतरतेमुळे कोकरांची कमकुवत वाढ होते व विकास देखील थांबतो. एवढेच नाही तर कोकरामध्ये अचानक मृत्यूचे समस्या देखील दिसून येते.

उपाययोजना : वजन कमी करण्याच्या तपासणीमध्ये दात परिक्षण करून घेणे महत्त्वाचे असते. दातांची समस्या ही विविध प्रकारच्या खनिजांची कमतरता किंवा फ्लोरोसिसच्या अतिरेकामुळे होत असते. या समस्येचे निदान करायचे असेल तर शेळ्यांच्या तोंडाची तपासणी वेळोवेळी करावी. जोन्स रोग मेंढी आणि शेळ्यांमधील जुनाट आजार आहे व हा वजन कमी करण्यासाठी कारणीभूत ठरतो. यामध्ये खाद्य योग्य प्रमाणात खाल्ले तरीही प्रादुर्भावित प्राण्याच्या जबड्यात खाली पाणी जमा होते, अशक्तपणा येतो तसेच मेंढ्यांमध्ये लोकर कमी होते, हगवन इत्यादी लक्षणे दिसतात. शेळ्यांच्या पायाला लंगडेपणा असणे हीदेखील एक समस्या असून हा रोग एका प्राण्यापासून दुसऱ्या प्राण्यांमध्ये पसरतो व वजन कमी करत असतो. वरील दोन्ही कारणांसाठी पशुवैद्याच्या सल्ल्याने शेळ्यांना योग्य उपचार करावेत.




# जनावरांच्या पोटातील जंत : उपाय आणि नियंत्रण

पशुपालकांनाही दुहेरी नुकसान सहन करावे लागत आहे. सर्वप्रथम पोटात जंत येताच गाई, म्हशी किंवा मेंढ्या-मेंढ्या त्यांच्या सामान्य प्रमाणापेक्षा जास्त चारा खातात. दुसरीकडे, दूध उत्पादन आणि वाढ कमी होते. शिवाय या आजारामुळे पशुपालकांना उपचारासाठीही खर्च करावा लागत आहे. परंतु काही उपायांचा अवलंब करून पशुपालक त्यांचे नुकसान दूर करू शकतात आणि जनावरांना या समस्येपासून दूर ठेवू शकतात.

जंत झाल्यास होतात अनेक परिणाम : प्राण्यांच्या पचनसंस्थेच्या आत राहून, त्याचे ऊतक द्रव आणि रक्त शोषून घेतात. हे प्राण्यांच्या फुफ्फुसे, श्वासनलिका आणि डोळे इत्यादींमध्ये देखील आढळू शकतात. त्यांची अंडी शेणासोबत बाहेर पडतात ज्यामुळे कुरण, धान्य आणि पाण्याचे स्रोत दूषित होतात. हे चार प्रकारचे असतात, हुकवर्म्स (रक्त शोषणारे), टेपवर्म्स (पचनसंस्थेत आढळतात), अँफिस्टोम (रुमेनमधील फ्लॅटवर्म्स) आणि यकृतामध्ये आढळतात), शिस्टोसोम्स (रक्त नसांमध्ये आढळतात). जनावराच्या पोटात कोणता जंत आहे यावर अवलंबून उपचार केले जातात.

जनावरांच्या पोटातील जंतांची लक्षणे : अतिसार, वाढ उशीरा, दुधाचे उत्पादन कमी होणे, प्रजनन क्षमता कमी होणे, काम करण्याची क्षमता



कमी होणे, रोगाशी लढण्यात कमजोरी आणि अशक्तपणा. अँफिस्टोम वर्मच्या बाबतीत, दुर्गंधीयुक्त जुलाब आणि खालच्या जबड्यात पाणी भरते. कधी कधी कावीळ ही अँफिस्टोम वर्म्सच्या संसर्गामुळेही होते. टेपवर्मचा संसर्ग झाल्यास, लटकलेले पोट आणि त्याचा एक छोटा पांढरा तुकडा शेणात फिरताना दिसतो. हुकवर्म आणि शिस्टोसोम संसर्गामुळे, अशक्तपणामुळे रक्तरंजित अतिसार होतो. वाहणारे नाक आणि घोरणे हे शिस्टोसोमियासिसचे लक्षण आहेत. जनावरांच्या फुफ्फुसात कृमी झाल्यामुळे खोकला होऊ शकतो.प्रतिबंध आणि उपचार : अँथेल्मिंटिकचा पहिला डोस १०-१४ दिवसांच्या वयाच्या वासराला द्यावा.

वासरू सहा महिन्यांचे होईपर्यंत वैद्यकीय सल्ल्यानुसार आहार देणे सुरू ठेवा. सहा महिने किंवा त्याहून अधिक वयाच्या सर्व जनावरांना वर्षातून दोनदा जंतनाशक औषध द्यावे, पहिली पावसाळ्याच्या आधी आणि दुसरी पावसाळा संपल्यावर. रुमेन बायपास टाळण्यासाठी, औषध तोंडात न देता जिभेच्या मागे द्यावे. जमिनीतील अंड्यांची संख्या कमी करण्यासाठी औषध फवारणी करावी. गाभण जनावरांनाही दोनदा जंतनाशक औषध द्यावे, पहिला डोस प्रसूतीच्या आसपास आणि दुसरा डोस प्रसूतीनंतर ६-७ आठवड्यांनी द्यावा. जनावरांना उपचाराचा फायदा होत नसेल, तर त्याच्या शेणाची पशुवैद्यकाकडून तपासणी करून अळीच्या प्रादुर्भावानुसार औषध वापरावे. गोगलगाय इ. ओलसर ठिकाणी वाढतात जेथे फ्ल्यूक आणि शिस्टोसोम संसर्ग होण्याची शक्यता असते. कारण या परजीवींचे जीवनचक्र गोगलगायींशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. औषधांचा प्रतिकार टाळण्यासाठी, एकाच प्रकारचे औषध वारंवार वापरू नका. जंतनाशक औषध फक्त वैद्यकीय सल्ल्यावरच वापरा, स्वत: ची औषधोपचार करू नका.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६९९ : शिख धर्मगुरू श्री.गुरू गोबिंद सिंघ यांनी खालसा पंथ ची स्थापना केली.
१७२९ : थोरले बाजीराव पेशवे यांनी जैतपूर येथे महंमदशहा बंगश याचा पराभव केला.
१७५७ : प्लासीच्या लढाईत इंग्रजांनी बंगालच्या नबाबाचा पराभव केला. या विजयामुळे ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा पाया घातला गेला आणी ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने कोलकाता काबीज केले.
१८४२ : अमेरिकन शल्यविशारद डॉ. क्रॉफर्ड लाँग यांनी शस्त्रक्रिया करताना भूल देण्यासाठी इथर या द्रव्याचा प्रथमच वापर केला.
१८५६ : पॅरिसचा तह झाल्याने क्रिमियन युद्ध संपले.
१८८१ : लोकमान्य टिळकांनी संपादित केलेल्या 'मराठा' या दैनिकाची सुरूवात झाली.
१८८५ : पुणे यथे फर्ग्युसन महाविद्यालय सुरू झाले.
१९०५ : मांचुरियातील पोर्ट ऑर्थर सिटी येथील लढाईत जपानी सैन्याने रशियाचा पाडाव केला. आशियाई देशाने युरोपातील देशाचा केलेला पराभव ही त्या काळातील अतिशय महत्त्वाची घटना होती.
१९२९ : इंग्लड ते भारत अशी विमानमार्गे साप्ताहिक टपालसेवा सुरु करण्यात आली.
१९३६ : मध्य प्रदेश उच्च न्यायालयाची स्थापना
१९३९ : हेइंकेल १०० ह्या सैनिकी विमानाने ७४५ किमी / ताशी वेगाने उडण्याचा विक्रम केला.
१९४२ : दुसरे महायुद्ध  जपानी फौजांनी मनिला, फिलिपाइन्सवर ताबा मिळवला.
१९४४ : दुसरे महायुद्ध  दोस्त राष्ट्रांनी सोफिया, बल्गेरिया येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.
१९४५ : दुसरे महायुद्ध  दोस्त राष्ट्रांनी न्यूरेम्बर्ग, जर्मनी येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.
१९५४ : राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी 'भारतरत्न' पुरस्कारांची स्थापना केली.
१९८९ : मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार सफदर हश्मी यांची नवी दिल्ली येथे पथनाट्य करत असतानाच निर्घृण हत्या
१९९८ : डॉ. सरोजिनी बाबर यांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वसंत गोवारीकर यांच्या हस्ते सन्माननीय डी. लिट. पदवी प्रदान
२००० : संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा असलेल्या चलनी नाण्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते प्रकाशन.
२००० : पनामा सरकारने ८५ वर्षांच्या कालखंडानंतर पनामा कालव्याचा पूर्ण ताबा घेतला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४६ : फ्रांसिस गोया, स्पॅनिश चित्रकार.
१८३२ : व्हिंसेंट व्हान गॉ, डच चित्रकार.
१८५३ : डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉग यांचा जन्म. (मृत्यू: २९ जुलै १८९०)
१८९४ : इल्युशीन विमान कंपनी चे निर्माते सर्जी इल्युशीन यांचा जन्म. (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९७७)
१८९५ : सोविएत युनियनचे अध्यक्ष निकोलाय बुल्गानिन यांचा जन्म. (मृत्यू: २४ फेब्रुवारी १९७५)
१८९९ : बंगाली लेखक शरदेंन्दू बंदोपाध्याय यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९७०)
१९०६ : भारतीय भूदलाचे ६ वे सरसेनापती जनरल कोडेन्डेरा सुबय्या तथा के. एस. थिमय्या यांचा जन्म. (मृत्यू: १७ डिसेंबर १९६५)
१९०८ : अभिनेत्री देविका राणी यांचा जन्म. (मृत्यू: ९ मार्च १९९४)
१९२० : आयझॅक असिमॉव्ह  अमेरिकन जीवरसायनशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथालेखक (मृत्यू: ६ एप्रिल१९९२)
१९३२ : हरचंदसिंग लोंगोवाल  अकाली दलाचे अध्यक्ष (मृत्यू: २० ऑगस्ट १९८५)
१९३८ : वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम चे स्थापक क्लाउस स्च्वाब यांचा जन्म.
१९४२ : भाषातज्ज्ञ, कोशकार, लेखक आणि कवी वसंत आबाजी डहाके यांचा जन्म.
१९५९ : किर्ती आझाद  क्रिकेटपटू आणि खासदार
१९६० : रमण लांबा  क्रिकेटपटू (मृत्यू: २३ फेब्रुवारी १९९८)
१९७७ : भारतीय संचालक आणि पटकथालेखक अभिषेक चोब्बे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३१६ : अल्लाउद्दीन खिलजी  दिल्लीचा सुलतान (जन्म: )
१६६५ : मुरारबाजी, पुरंदर किल्ल्याला वेढा घालणाऱ्या दिलेरखानाशी झुंज दिलेला
१९३५ : मोरेश्वर वासुदेव तथा नरकेसरी अभ्यंकर  स्वातंत्र्यसैनिक, टिळकांच्या विचारसरणीचे मध्य प्रांताचे काँग्रेस नेते, वकील (जन्म: १९ ऑगस्ट १८८६)
१९४३ : हुतात्मा वीर भाई कोतवाल (जन्म:)
१९४४ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे  अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (जन्म: २३ एप्रिल १८७३)
१९५२ : भूतानचे २ रे राजे जिग्मे वांगचुक यांचे निधन.
१९६९ : कवी व समाजसेवक वासुदेव गोविंद मायदेव यांचे निधन. (जन्म: २६ जुलै १८९४)
१९७६ : रघुवीर शंकर मुळगावकर, विख्यात चित्रकार, रंगसम्राट.
१९८१ : रीडर्स डॉजेस्ट चे निर्माते डेविट वलास यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८८९)
१९८९ : सफदर हश्मी  मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार (जन्म: १२ एप्रिल १९५४)
१९९३ : एस. एम. पंडित, भारतीय चित्रकार.
१९९९ : विमला फारुकी  भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या आणि महिला चळवळीतील कार्यकर्त्या (जन्म:)
२००२ : आनंद बक्षी, हिंदी चित्रपटगीतकार.
२००२ : अनिल अग्रवाल  पर्यावरणवादी (जन्म: ? ? १९४७)
२००५ : भारतीय लेखक आणि चित्रकार ओ. व्ही. विजयन यांचे निधन. (जन्म: २ जुलै १९३०)
२०१२ : कॅनेडियन-भारतीय समाजशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक अक्विला बेर्लास किंनी यांचे निधन.

cmyk




रविवार दि.३० मार्च २०२६ ५

राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत




# मातृत्वाच्या भावनेतून मी तुमची सेवक म्हणून काम करतेय

## ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते अंबाजोगाईत जनसंपर्क कार्यालयाचे थाटात उदघाटन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड हा माझा जिल्हा आहे. या जिल्ह्यावर माझे विशेष प्रेम आहे. 'आईची माया दाईला येत नसते' या पद्धतीने या जिल्ह्याच्या विकासासाठी आपली सदैव तळमळ राहिली आहे आणि राहणार आहे. मी तुमची सेवक म्हणून काम करणार आहे, यात मातृत्वाची भावना देखील आहे. मंत्री असताना मी यापूर्वीही अंबाजोगाईत जनतेच्या कामांसाठी कार्यालय सुरू केले होते.त्याच प्रथेला अनुसरून आज अंबाजोगाई येथे संपर्क कार्यालय सुरू केले आहे. हे कार्यालय सर्वसामान्य जनतेला विनासायास व विनाकष्ट जिथल्या तिथे त्यांची कामे होण्यासाठी कार्यरत राहील अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे दिली.



शहरातील प्रशांत नगर येथे सुरू करण्यात आलेल्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज झाले त्यावेळी जिल्हाभरातून आलेल्या कार्यकर्त्यांसमोर त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, गेवराईच्या नगराध्यक्षा गीता भाभी पवार ,युवा नेते अक्षय मुंदडा, बालासाहेब दोडतले, संतोष हंगे, सलीम जहांगीर, आदित्य सारडा, युद्धजित पंडित, माधव निर्मळ, गणेश कराड आदींसह भाजपाचे जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी,मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की,जनतेची सर्व कामे जिथल्या तिथे पार पाडावी यासाठी एक सुसज्ज अशी यंत्रणा या माध्यमातून उभी करण्याचा आपला प्रयत्न आहे. मला भेटण्यासाठी राज्यभरातून येणाऱ्या लोकांचा मोठा जनसमुदाय असतो. यामध्ये सामान्य माणसाला भेटताना एकाच वेळी गर्दी झाल्याने धावपळ होते व कामेही नीट करता येत नाहीत. याला कुठेतरी शिस्त लागली पाहिजे व कामांचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. या दृष्टीकनातून आपण संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून एक सशक्त व सर्व उपयोगी अशी यंत्रणा उभी करत आहोत. या अनुषंगाने अंबाजोगाई येथील हे संपर्क कार्यालय जनतेची छोटी-मोठी सर्व कामे या ठिकाणावरून करणार आहे.लवकरच बीड येथेही अशाच पद्धतीचे संपर्क कार्यालय व जनतेच्या कामांसाठीची यंत्रणा आपण उभी करणार आहोत. त्याचप्रमाणे अन्य तालुक्यांच्या ठिकाणीही संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून अशी यंत्रणा उभी करण्याचा आपला मनोदय आहे.

आपण सदा सर्वकाळ जनतेसाठी उपलब्ध असतो. परंतु विरोधकांनी कधीकाळी याच गोष्टीचा मुद्दा बनवत माझ्यावर टिका केली, नावे ठेवली आहेत. मात्र सर्वांना माहीत आहे की आपण सदैव जनतेच्या कामांसाठी उपलब्ध असतो. मुंबई असो किंवा महाराष्ट्रभरात सर्वत्र फिरत असताना प्रत्येक ठिकाणी आपण जनता दरबार व जनतेची कामे करण्यातच व्यस्त असतो. यासाठीच माझे जीवन आहे. माझ्या जीवनात देवधर्म आणि जनता पूजा याशिवाय दुसरे काहीही नाही. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या विचारावर वाटचाल करत असताना त्यांच्याच पद्धतीने काम करण्याचा सदैव आपण प्रयत्न केला आहे. मुंबई असो किंवा इतरत्र आपण देवपूजा झाल्यानंतर पहिल्यांदा लोकांच्या भेटीगाठी घेतो त्यानंतरच अन्न सेवन करतो. भेटणाऱ्यांचा लोंढा भरपूर असल्याने यामध्ये प्रत्येकाची व्यवस्थित भेट होणे.प्रत्येकाचा प्रश्न.प्रत्येकाची समस्या नीट समजावून घेणे आवश्यक ठरते. यासाठी विशिष्ट शिस्तबद्ध यंत्रणा आपण राबवत आहोत आणि गेल्या काही दिवसात ही शिस्त व याचा चांगला परिणामही दिसून येत आहे. जनतेची कामे होणे हे शेवटी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठीच ही कार्यालये कार्यरत राहतील अशी ग्वाही यावेळी पंकजाताई मुंडे यांनी दिली.

यावेळी बोलताना ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की.लोकसभेला आपला झालेला पराभव जनतेच्या मनाला लागलेला आहे. या पराभवाने खचून जाऊन आपल्या काही बांधवांनी स्वतःचे जीवही गमावले आहेत. एवढे निसिम व निरपेक्ष प्रेम जनतेने आपल्या नेतृत्वावर केलेले आहे. त्यामुळे हे नेतृत्व जनतेसाठीच समर्पित असून बीड जिल्ह्यात आपला खासदार आणि सहाच्या सहा आमदार आपलेच होते. हेच यश पुन्हा एकदा आपल्याला निर्माण करून दाखववे लागेल.. बीड जिल्ह्यात आपल्याला शतप्रतिशत यश मिळवायचे आहे. हे आपले स्वप्न आह. एखादे स्वप्न आपण बघतो आणि ते पूर्ण होत नाही असे होणार नाही. कारण आपण जी स्वप्न बघितली ती सर्वसामान्य जनता आणि या बीड जिल्ह्यासाठी बघितलेली आहेत.ही स्वप्न पूर्ण करण्यासाठी जनता जनार्दन आणि ईश्वर निश्चितच आशीर्वाद देणार असल्याची आपल्याला खात्री आहे. बीड जिल्ह्यात येणाऱ्या काळात शतप्रतिशत आपला विजय व्हावा यासाठी ठिकठिकाणी निर्माण होणारी आपली संपर्क कार्यालय मोठं योगदान देतील असा आपल्याला विश्वास आहे. त्या दृष्टिकोनातून सशक्त व सुसज्ज अशी या कार्यालयाची यंत्रणा आपण करत आहोत.संपूर्ण बीड जिल्ह्यात आपलीच सत्ता येण्यासाठी सर्वांनी कामाला लागले पाहिजे असे आवाहन यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले.

## महाराष्ट्र सरकारचा निर्णय;अतिक्रमणवरील घरे नियमित करून, रहिवासी होणार मालक-आ. लोणीकर

### मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांचे लोणीकरांनी मानले आभार

जालना । प्रतिनिधी

विकसित महाराष्ट्रातील प्रत्येकाला राहण्यासाठी घर मिळाले पाहिजे या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने क्रांतिकारी निर्णय घेतलेला असून २० मार्च २०२६ रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार शासनाच्या मालकीच्या अतिक्रमण झालेल्या जागेवर या नागरिकांनी घरे बांधले आहेत ती नियमित करून त्या घरांची मालकी नागरिकांना मिळणार असल्या ची माहिती माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांनी दिली आहे. आमदार लोणीकर यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की, यासाठी नागरिकांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या पुराव्यासह सादर करून त्यासोबत ज्या शासनाच्या अतिक्रमण केलेल्या जागेवर घर आहे तेथील मतदार यादीतील नाव, विज बिल ग्रामपंचायतचे रेकॉर्ड आदी पुरावे जोडणे आवश्यक असून , व्यावसायिक वापरासाठी असलेल्या घरांना नियमित करता येणार नसून फक्त निवासी वापरासाठी असलेल्या घरांना नियमित करण्यात येणार आहे असेही या पत्रकात नमूद करण्यात आले आहे



पुढे या पत्रकात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे की शासनाच्या ज्या जागेवर नागरिकाचे घर आहे ते ५०० चौरस फुटापर्यंत असेल तर अगदी मोफत भोगवटादार म्हणून त्या घराची मालकी त्यांना मिळणार आहे १५०० चौरस फुटांच्या घरासाठी त्या भागातील बाजारभावाच्या १० टक्के रक्कम भरून घराची मालकी मिळवता येणार असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले असू दरम्यान महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या या क्रांतिकारी निर्णयाची आमदार बबनराव लोणीकर यांनी स्वागत केले असून, २०४७ पर्यंत च्या विकसित महाराष्ट्र टप्प्यातला प्रत्येक नागरिकाला घर हा उपक्रम अतिशय महत्त्वाचा असून याबद्दल माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले असून परतूर विधानसभा मतदारसंघातील शासनाच्या जागेवर अतिक्रमण करून बांधण्यात आलेल्या घरांना नियमित करून घेण्यासाठी आपले अर्ज सादर करण्याचे आवाहन केले आहे.

## मोहसीन खान यांना महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय व्यसनमुक्ती पुरस्कार प्रदान

### बिलोलीच्या भुमिपुत्राचा मुंबईत सन्मान

बिलोली । प्रतिनिधी

येथील पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते डॉ.मोहसीन खान मुजीबपाशा यांना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे दिला जाणारा 'राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार केंद्रिय सामाजिक न्यायमंत्री ना,खा. रामदास आठवले यांच्या हस्ते गुरुवार, दि.२६ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह, नरिमन पॉईंट येथे आयोजित समारंभात प्रदान करण्यात आला. सन २०२१-२०२२ या वर्षासाठीचा हा पुरस्कार असून, डॉ.मोहसीन खान यांना सन्मानपत्र,स्मृतिचिन्ह,शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.



त्यांच्या या यशामुळे बिलोली तालुक्याच्या सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला आहे.डॉ.खान हे गेल्या अनेक वर्षांपासून व्यसनमुक्ती, पर्यावरण, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत.तसेच पत्रकारितेच्या माध्यमातून व्यसनाधीनता निर्मूलनासाठी त्यांनी सातत्याने लेखन करून जनजागृती केली आहे.या पुरस्कार वितरण सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून विधानसभा अध्यक्ष अड. राहुल नार्वेकर, सामाजिक न्याय मंत्री ना.संजय शिरसाट, आ.तुषार राठोड, माजी गृहमंत्री सिध्दराम म्हेत्रे, उपसचिव रविंद्र गोरवे तसेच समाजकल्याण विभागाचे सर्व अधिकारी,मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डा. हर्षदीप कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन हर्षल पाटील व धनश्री प्रधान यांनी केले, तर आभार समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ मुंडे यांनी मानले. डॉ. मोहसीन खान यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल आमदार हेमंत पाटील,आ. बालाजी कल्याणकर, आ.विक्रम काळे, आ.सतीश चव्हाण, आ.आनंदराव बोंढारकर तसेच जिल्हा समाजकल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार, प्रभारी समाजकल्याण निरिक्षक राजेश सोनटक्के, विविध वर्तमानपत्रांचे संपादक, पत्रकार, हितचिंतक व मित्रपरिवार यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## मनपा शाळांची पटसंख्या, गुणवत्ता वाढली

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अनिल मकरीये यांनी शिक्षण विभागाची आढावा बैठक घेतली. या बैठकीत 'स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल' या प्रकल्पांतर्गत राबविलेल्या उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. महानगरपालिकेच्या शाळांमधील पटसंख्या आणि गुणवत्तेत वाढ झाल्याचे या आढाव्यातून समोर आले. आयुक्त यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या प्रकल्पाचे व्हिडिओ सादरीकरण सहायक कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे यांनी केले. या उपक्रमामुळे सर्व शाळा 'स्मार्ट' झाल्या असून, विद्यार्थ्यांची पटसंख्या आणि शैक्षणिक गुणवत्ता लक्षणीयरीत्या वाढल्याचे दिसून आले.

या यशाबद्दल स्थायी समिती सभापती मकरीये यांनी आयुक्तांचे अभिनंदन केले. त्यांनी महानगरपालिकेच्या शाळांना आवश्यक असलेल्या सर्व सोयी-सुविधा पुरवण्याचे आश्वासन दिले. तसेच, विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणखी वाढवण्यासाठी सर्व मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी प्रयत्न करावेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. किराडपुरा क्रमांक एक, नारेगाव मराठी आणि उर्दू शाळेतील (सिल्क मिल कॉलनी) वाढलेल्या पटसंख्येबद्दल सभापतींनी विशेष अभिनंदन केले. या बैठकीला उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे, शिक्षणाधिकारी भारत गोटे, शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ थोरे, अधीक्षक गोविंद बाराबोटे, सहायक कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे, सर्व केंद्रीय मुख्याध्यापक, अंतर्गत शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षण विभागातील कर्मचारी उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे यांनी केले.

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केली कोषागार कार्यालयाची तपासणी



जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील तरतुदीनुसार मार्च २०२६ अखेर करण्यात येणाऱ्या वार्षिक तपासणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज दि. २७ मार्च २०२६ रोजी जिल्हा कोषागार कार्यालयास भेट देऊन तपासणी केली.तपासणी दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी जिल्हा कोषागार अधिकारी पंजाबराव पुंडगे, लेखाधिकारी श्री. वनगुजरे, अप्पर कोषागार अधिकारी श्री. भिंगारे, श्री. झरेकर व श्री. वीर तसेच मुद्रांक प्रमुख श्याम मारोडे उपस्थित होते. संबंधित अधिकाऱ्यांनी वार्षिक तपासणी संदर्भातील आवश्यक कागदपत्रे व नोंदी सादर केल्या.तपासणीदरम्यान कामकाजाबाबत समाधान व्यक्त करत जिल्हाधिकारी मित्तल यांनी कार्यालयाच्या एकूण कार्यपद्धतीचे कौतुक केले. तसेच, मार्च २०२६ अखेरच्या अनुषंगाने शासनाचे अनुदान व्यपगत होऊ नये यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच जिल्हा कोषागार कार्यालयाकडून शासनाच्या आर्थिक व्यवहारांची अचूक व पारदर्शक अंमलबजावणी होत असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## मुलींच्या वसतिगृहात निकृष्ट दर्जाचे भोजन दिल्यामुळे

## आचारीसह दोन महिलेची हाकलपट्टी

अंबड । प्रतिनिधी

तालुक्यातील अंबड घनसावंगी रोडवरील वलखेडा फाटा येथील शासकीय मुलींच्या वसतिगृहात निकृष्ट दर्जाचे जेवण मिळत असल्याची लेखी तक्रार तहसीलदारांकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात वस्तीगृहाची चौकशी केली असता यामध्ये भाज्या बनणारा आचारी व वांगे बटाटे कापणारे दोन महिला जबाबदार असल्यामुळे सदरील आचारी व दोन महिला यांना शासकीय वस्तीगृह इथून कामावरून काढण्यात आले आहे .

सदरील मुलीच्या वस्तीगृहावर महिला गृहपालाची नियुक्ती करणे गरजेचे आहे अशी मागणी मुलीकडून करण्यात येत आहे. सदरील मुलीच्या वस्तीगृहवर गृहपाल म्हणून पुरुष असल्यामुळे सदरील वस्तीगृहावर चौकशी करणे शक्य होत नाही. वसतिगृहातील मुलींनी थेट तहसील कार्यालयात जावून तहसीलदारांची भेट घेवून त्यांच्यासमोर आपबिती कथन केली. मुलींच्या म्हणण्यानुसार, वसतिगृहात दिले जाणारे अन्न दर्जाहीन असून वेळेवरही योग्य प्रमाणात जेवण दिले जात नाही. यामुळे विद्यार्थिनींच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचीही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. सदरील वस्तीगृह महिला गृहपालाची नियुक्ती करणे योग्य आहे असे विद्यार्थिनींचे म्हणणे आहे.दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत तहसीलदारांकडे लेखी तक्रार करण्यात आली आहे. संबंधित विभागाने वस्तीगृहाची चौकशी करून दोषींवर आज चौकशी करून कारवाई केली , तसेच वसतिगृहातील मुलींना दर्जेदार व पौष्टिक आहार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत असून, प्रशासनाने तातडीने लक्ष घालून समस्या सोडवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


### जाहीरनामा

**विलंबित जन्म नोंद आदेश मिळणेबाबत**

**जन्म-मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ (२) व (३) अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, संदर्भ क्र. (४) येथील अर्जान्वये अर्जदार यांनी खालील नमुद बाळाच्या/व्यक्तीच्या जन्मनोंदीबाबत विलंबित जन्म नोंद आदेश मिळणेबाबत अर्ज या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे. अर्जान्वये अर्जदार यांचे कुटुंबातील व्यक्तीची / बाळाची जन्मतारीख व जन्मठिकाण खालीलप्रमाणे आहे.

| अक्र | व्यक्तीचे नांव | अर्जदाराशी असलेले नाते | जन्म तारीख | जन्मठिकाण |
|---|---|---|---|---|
| १) | आरबाज अय्युब शेख | अर्जदार यांचा मुलगा | ०१/१२/२०२३ | मंजरथ |

प्रकरणात उक्त नमुद व्यक्तीची/ बाळाची जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मंजरथ यांचे नोंदवहीत उपलब्ध नसल्याने त्याबाबत जन्म नोंदवहीमध्ये घेऊन जन्म प्रमाणपत्र मिळण्याचे अनुषंगाने ग्रामपंचायत अधिकारी तथा निबंधक, जन्म/मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत कार्यालय, मंजरथ ता. माजलगांव जि. बीड यांना आदेशित करण्याकरिता विलंबित जन्म नोंद आदेश मिळणेबाबत अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता उक्त नमुद व्यक्तीची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत व्यक्तीने या कार्यालयात हजर राहुन /अर्ज सादर करुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखल केल्यास सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद जन्मतारीख व जन्मठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत पुढील विहित कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित

तहसिलदार तथा कार्यकरी दंडाधिकारी माजलगांव


## उन्हाळ्यातील कामे:उन्हाळा सुरु होताच वाळवणाची लगबग

### ग्रामीण भागांत कुरडई, पापड्या,पापड बनविण्याची तयारी सुरु

घनसावंगी । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यात उन्हाळा लागला की महिलांना वाळवणाचे वेध लागतात. वेगवेगळ्या प्रकारचे वाळवण तयार होते. साठवणूक होते. उन्हाळ्यात ऊन जास्त असते. ग्रामीण भागात घरोघरी वाळवण घातले जाते. ते उन्हात पूर्ण वाळते. वर्षभर टिकते. खराब होत नाही. वाळवणासाठी घरातील लहान-मोठे तयारीला लागतात. वडा, कुरडई, पापड्या, खरवड्या, पापड, वेफर्स, सांडगे, साबुदाणा चकली, ज्वारी पापड्या, नागीली, तांदूळ खीचे असे पदार्थ बनवण्यात महिला रममाण दिसतात. लग्नात हाच रुखवत म्हणून नवरी मुलीसोबतही पाठविला जातो. तालुक्यात मोठ्या प्रमाणात महिला उन्हाळ्यात वर्षभर पुरेल इतके वाळवण घरीच करतात.

वाळवण करताना काळजी घ्यावी लागते. उन्हाचे चटके बसू नयेत. वाळवणाला चांगले ऊन मिळावे. म्हणून गृहिणी पहाटेच उठतात. तयारीला लागतात. अनुभव लागतो. कौशल्य लागते. मेहनत लागते. या वाळवणात बटाट्याचा किस, पापड, मसाले, आंबा, लिंबू, मिरचीचे लोणचे, कुरडई, मिरची पावडर, शेवया यांचा समावेश असतो. हे पदार्थ उन्हाळ्यात बनतात. वर्षभर साठवून ठेवता येतात. हवे तेव्हा अंबरससोबत तळून, भाजून खाता येतात. या दिवसांत गहू, तांदूळ, बाजरी आदी कडधान्यांनाही ऊन दिले जाते. पूर्वी उन्हाळा आला की साठवणीच्या पदार्थांसाठी घरात लगबग असायची. आता शहरात फार कोणी वाळवण करत नाही. महिलांना नोकरीमुळे वेळ मिळत नाही. त्यामुळे रेडिमेड ऑर्डर देऊन पदार्थ बनवून घेतले जातात. ग्रामीण भागात बऱ्यापैकी महिला आजही वाळवण करतात. दरम्यान, रेडिमेड ऑर्डरचे भाव किलोमध्ये अशाप्रकारे आहेत. यात कुरडई गहू तीळ ४०० रुपये किलो. शेवई रवा १०० किलो. शेवई गहू २०० किलो. पापड्या १०० ते २००. खरवड्या ३०० किलो. पापड, वेफर्स १०० नग १०० ते २००. साबुदाणा चकली ३०० किलो. ज्वारी पापड १०० नग २००. नागीली तसेच तांदूळ खीचे १०० नग २०० रुपये प्रमाणे आहेत. वाळवणाचा वर्षभर केला जातोय वापर उन्हाळ्यात वाळवण मोठ्या प्रमाणात तयार होते. या पदार्थांसाठी ऊन महत्त्वाचे असते. सकाळी तयार केलेले वाळवण संध्याकाळपर्यंत चांगले सुकावे. ते नीट वाळवावे लागते. नाहीतर ते आंबट राहते. ओले राहिले तर खराब होते. म्हणून उन्हाळा सुरू झाला की आम्ही महिला कुरडई, पापड तयार करण्याच्या तयारीला लागतो. मग हे वाळवण वर्षभर वापरत असल्याचे नंदिनी तुपे यांनी सांगितले.

cmyk

# जिल्हास्तरीय महिला बचत गटांचे विक्री प्रदर्शन भरले हॉटेलात

## जिल्हा व महिला विकास विभागाच्या लाखो रुपयांची उधळपट्टी!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सध्या महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने २०२६ मधिल जिल्हास्तरीय महिला बचत गटांच्या उत्पादित केलेल्या मालांचे दि.२७ मार्च ते २९ मार्च २०२६ असे तिनदिवसीय विक्री महोस्तव /प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.सदर प्रदर्शन सुमारे सव्वादोन लाख लोकसंख्या असलेल्या बीड शहरात जालना रोडवरील हॉटेल यशराज इन येथे आयोजित केले आहे. वास्तविकता ग्रामीण भागातील महिला बचत गटातील सदस्यांना मोठी बाजारपेठ उपलब्ध व्हावी ,त्यांना खरेदी -विक्री चे व्यवहारिक ज्ञान मिळावे , शहरातील ग्राहकांना ग्रामीण भागातील दर्जेदार ,वस्तू उत्पादनांची विक्री व्हावी आदी उद्देशांसाठी महिला आर्थिक विकास महामंडळ दरवर्षी लाखो रुपये खर्च करून शहराच्या, जिल्ह्याच्या ठिकाणी ग्रामीण महिला बचत गटांच्या वतीने उत्पादित मालांचे वस्तूंचे विक्री प्रदर्शन /महोत्सव आयोजन करत असते परंतु काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या मनमानी



कारभारामुळे सदर विक्री प्रदर्शनाच्या उद्देशालाच हरताळ फासल्याचे समोर आले आहे. बीड शहरातील सार्वजनिक ठिकाणी सदर महोत्सवाचे प्रदर्शनाचे आयोजन करणे आवश्यक असताना एका व्यावसायिक हॉटेलमध्ये अत्यंत तोकड्या जागेत जिल्ह्यातून फक्त ३५ स्टॉलचे प्रदर्शन आयोजन केले आहे.तीन दिवसाच्या प्रदर्शनामध्ये महिला व बालकल्याण विभागाचे लाखो रुपये या ठिकाणी खर्च केले जाणार असून सहभागी झालेल्या ३५ स्टॉलधारक महिलांना याबाबत विचारणा केली असता आयोजकांवर त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. कारण त्यांनी उत्पादित केलेल्या मालाची विक्री अपेक्षेप्रमाणे झाली नसल्याचे सांगितले आहे. ज्या ठिकाणी ग्राहक वर्ग उपलब्ध आहे त्या सार्वजनिक ठिकाणी सदर प्रदर्शनाचे आयोजन केले असते तर महिलांना अधिक बाजारपेठ मिळाली असती मात्र शासनाचे लाखो रुपये खर्च दाखवून हडप करायच्या लालचे पोटी सदर प्रदर्शनाचे एका व्यवसायिक हॉटेलमध्ये तोकड्या जागेत आयोजन केले आहे ही गंभीर बाब क्रांतिकारी शेतकरी संघटनेने समोर आणली असून महिला व बालकल्याण मंत्री ना.अदिती तटकरे यांच्याकडे सविस्तर तक्रार करून बेजबाबदार अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार असल्याची माहिती क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी दिली.

# सातबारावर नाव असताना धारकाला वगळले भूमी अभिलेख विभागाचा मनमानी कारभार

**सोमीनाथ कोल्हे करणार उपविभागीय अधिकाऱ्यांकडे तक्रार; दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी**

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सर्वे क्रमांक ७१५ च्या मोजणी प्रक्रियेत भूमी अभिलेख विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.संबंधित जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर 'इतर हक्क' मध्ये स्पष्टपणे नाव नोंद असतानाही सहधारक सोमीनाथ कुंडलिक कोल्हे यांना मोजणी संदर्भात कोणतीही नोटीस देण्यात आली नसल्याचा आरोप पुढे आला आहे.

माहितीनुसार सर्वे नं. ७१५ मधील मोजणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असताना इतर सहधारक व हक्कधारकांना नोटीस देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.मात्र,स्वतःचे नाव सातबारावर असतानाही सोमीनाथ कोल्हे यांना नोटीस न देणे ही गंभीर प्रशासकीय चूक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.या प्रकारामुळे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन झाल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला आहे.

या पार्श्वभूमीवर सोमीनाथ कोल्हे यांनी उपविभागीय अधिकारी,पाटोदा यांच्याकडे सविस्तर तक्रार अर्ज सादर करण्याचा निर्णय घेतला असून सोमवार रोजी हा अर्ज देण्यात येणार आहे.तसेच, संबंधित प्रकरणात निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी,अशी ठाम मागणीही त्यांनी केली आहे.

दरम्यान,नोटीस न देता सुरू झालेली मोजणी प्रक्रिया एकतर्फी व नियमबाह्य असल्याचा आरोप करण्यात येत असून यामुळे पुढील काळात या प्रकरणात गोंधळ निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.आता या तक्रारीवर उपविभागीय अधिकारी काय भूमिका घेतात, तसेच मोजणी प्रक्रियेवर स्थगिती दिली जाते का याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

धारकाचे नाव ७/१२ वर असताना नोटीस न देणे ही गंभीर बाब असुन, बेजबाबदार संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी- सोमीनाथ कोल्हे माझे नाव सातबारा उताऱ्यावर स्पष्टपणे नोंद असताना मला जाणीवपूर्वक नोटीस न देणे हा अत्यंत गंभीर प्रकार आहे.संबंधित अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडण्यात निष्काळजीपणा केला असून हा प्रकार सहन केला जाणार नाही.या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांवर तात्काळ कठोर ◀◀ पान ३ वर

# बीडच्या सुपुत्राचा महाराष्ट्रात डंका

**संचालक भोपळे यांचा मुख्यमंत्र्यांचे हस्ते सन्मान**

बीड । प्रतिनिधी

मूळचे बीडचे सुपुत्र असलेले नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाचे महाराष्ट्राचे संचालक जितेंद्र लक्ष्मणराव भोपळे यांचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल दिनांक २८ मार्च रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १५० दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत ई गव्हर्नन्स मध्ये जनतेसाठी अमुलाग्र बदल करणाऱ्या कार्यालय प्रमुखांच्या कामाचा दिनांक २८ मार्च रोजी सन्मान



करण्यात आला याच कार्यक्रमात बीडचे सुपुत्र असलेले स्वातंत्र्य सैनिक स्व.एड.लक्ष्मणराव भोपळे यांचे चिरंजीव नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाचे संचालक जितेंद्र लक्ष्मणराव भोपळे यांना सन्मानित करण्यात आले. या सन्मानाबद्दल त्यांचे नातेवाईक मित्र परिवारातून त्यांचे अभिनंदन होत आहे

# वस्ताद अनिकेत गोरे याने मारले जवळ्याचे मैदान!

## श्रीराम जन्मोत्सवानिमित्त रंगला जंगी कुस्त्यांचा फड

दिंद्रुड । प्रतिनिधी

दिंद्रुड येथून जवळच असलेल्या मौजे जवळा (फ.) येथे श्रीराम जन्मोत्सवानिमित्त कुस्त्यांचा जंगी फड रंगला. बजरंग बली कुस्ती संकुलचे वस्ताद अनिकेत गोरे याने शेवटची कुस्ती करत मैदान मारले. खांद्याला दुखापत झाल्यामुळे हाताची शस्त्रक्रिया झालेली असतांनाही त्याने पाटोदा येथील संदीप गीते याला काही मिनिटात चितपट केले. हजारो कुस्ती शौकीन रसिकांनी कुस्त्यांचा आनंद घेत तरुण पहेलवांनांना बक्षिसी देत त्यांचे कौतुक केले. सरपंच त्रिंबक साबळे, उपसरपंच तारेख शेख यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व गावकऱ्यांनी



उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

मागील काही वर्षांपासून रामनवमी निमित्त धारूर तालुक्यातील जवळा येथे सर्व ग्रामस्थांच्या वतीने कुस्त्यांचे मैदान भरवण्यात येते. यावर्षी भरवलेल्या फडात तानाजी चौरे विरुद्ध चाऊस , लखन बडे विरुद्ध इमरान शेख, ईश्वर पालकर व दीपक चौरे यांच्यात झालेल्या कुस्त्या प्रेक्षणीय झाल्या. लहू सुरनर, बंटी लटपटे, अक्षय खांडेकर, अमन शेख, करण नरवटे, ◀◀ पान ३ वर

# महावीर जयंतीनिमित्त आष्टीत कत्तलखाने व मांसविक्री दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय -नगराध्यक्ष जिया बेग

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरात जैन धर्मातील २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, दि.३१ मार्च रोजी विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण शहरात ही जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्याची तयारी सुरू आहे.

महावीर जयंती हा जैन समाजासाठी अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा दिवस मानला जातो. भगवान महावीर यांनी दिलेला अहिंसा, सत्य, करुणा आणि सर्व जीवांप्रती दया या मूल्यांचा संदेश लक्षात घेता, या दिवशी शहरात कोणत्याही प्रकारची जीवहानी होऊ नये, यासाठी आष्टी नगरपंचायतीने विशेष निर्णय घेतला आहे. नगराध्यक्ष जिया बेग यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवार, दि. ३१ मार्च रोजी महावीर जयंतीनिमित्त आष्टी शहरातील सर्व कत्तलखाने तसेच मटण, चिकन आणि मासे विक्री करणारी दुकाने दिवसभर पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत. या निर्णयामागे धार्मिक भावना जपणे, तसेच शहरात शांतता व सौहार्दाचे वातावरण कायम ठेवणे हा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, महावीर जयंतीनिमित्त शहरात प्रभात फेरी, धार्मिक मिरवणुका, प्रवचने आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरात दिवसभर उत्सवी वातावरण राहणार आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे जयंतीचे पावित्र्य अधिक वृद्धिंगत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या आदेशाचे सर्व संबंधित मांस विक्रेते, कत्तलखाना चालक तसेच नागरिकांनी सहकार्य करून काटेकोर पालन करावे, असे आवाहन नगराध्यक्ष जिया बेग यांनी केले आहे. महावीर जयंतीच्या निमित्ताने संपूर्ण शहरात स्वच्छता, शांतता आणि धार्मिक एकात्मतेचे वातावरण निर्माण व्हावे, यासाठी आष्टी नगरपंचायतीकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचेही नगराध्यक्ष जिया बेग नमूद केले.

# पक्ष विस्तार व बळकटीसाठी कार्यकर्त्यांनी योगदान द्यावे-जीवनराव गोरे



बीड प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने बीड जिल्ह्यात संघटन विस्तार आणि बळकटीसाठी व्यापक नियोजन सुरू केले असून, लवकरच जिल्हाभर तालुकानिहाय बैठकींचे आयोजन करण्यात येणार आहे. या माध्यमातून पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी ठोस रणनीती आखली जाणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली.

राष्ट्रवादी भवन, बीड येथे जिल्हा पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या अध्यक्षते खाली जिल्हास्तरीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. बैठकीस जेष्ठ नेते अँड. डी. बी. बागल, माजी आमदार सय्यद सलीम भाई, माजी आमदार पृथ्वीराज साठे, युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब भाई शेख, प्रदेश उपाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, जेष्ठ नेते मोहनराव जगताप, प्रदेश सरचिटणीस राजाभाऊ फड, प्रदेश प्रवक्त्या अँड. हेमाताई पिंपळे, राज्य प्रवक्ते शिवराज बांगर, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, अँड. नारायणराव डक,सुभाष सपकाळ,युवक जिल्हाध्यक्ष सतिश शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष व विविध आघाड्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीची सुरुवात स्वर्गीय लोकनेते अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर संघटनात्मक बांधणी, पक्ष विस्तार, मजबुतीकरण आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सखोल चर्चा झाली.

# आ.धस यांच्या माध्यमातून किसनबाई भवर सीएम फंडातून पन्नास हजार

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मुगगाव ता पाटोदा येथील किसनबाई बापुराव भवर यांची उपचार साठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून पन्नास हजार रुपये मदत मिळालेले संबंधित कुटुंब भवर मोठा दिलासा मिळाला आहे.



आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील मतदारसंघातील गोरं गरीबांचे सर्व सामान्य माणसाला मदतीला धावून जाणारे आरोग्यदुत म्हणून ओळखले जाणारे आमदार श्री सुरेश आण्णा धस यांनी प्रयत्न केले आहे किसनाबाई बापुराव भवर हे साई एशियन हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत पुढील पुढील शास्त्रीय साठी मोठा खर्च अपेक्षित असल्याने मारुती भवर यांनी माऊली आपा जरागे फोन लावत आई साई एशियन हॉस्पिटलमध्ये दाखल आहेत आणि माऊली आपा लगेच आमदार श्री सुरेश आण्णा धस यांची संपर्क साधून त्यानंतर आ सुरेश आण्णा धस यांनी पिए विकास साळवे हॉस्पिटलमध्ये पाठवून भवर कुटुंबाला मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत देण्यासाठी सूचना केल्या सदरची रक्कम साई एशियन हॉस्पिटल खात्या वर जमा करण्यात आली आईची यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली आहे किसन बाई बापुराव भवर यांची प्रकृती सुधारत येतं आहे आर्थिक मदत मिळाल्यामुळे भवर यांची आमदार श्री सुरेश आण्णा धस व माऊली आपा जरागे आभार व्यक्त केले आहे

# परळी बसस्थानक परिसरात सापडलेल्या दीड वर्षांच्या मुलीबाबत पोलीसांची शोध मोहीम सुरू

परळी । प्रतिनिधी

बसस्थानक परिसरात एका दीड वर्षांच्या मुलीला तिच्या आई-वडिलांनी किंवा पालकांनी उघड्यावर सोडून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास परळी बसस्थानक परिसरात संबंधित मुलगी आढळून आली. याबाबत सालोमन मायकल कसबेकर (वय ५२, व्यवसाय - नोकरी, अधीक्षक आशा शिशुगृह, परभणी, रा. चिद्रावर नगर, जुना पेंढगाव रोड, परभणी) यांनी दिनांक २६ मार्च २०२६ रोजी संभाजीनगर परळी वैजनाथ पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ९३ अन्वये गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक ए. टी. शिंदे हे करीत आहेत.

दरम्यान, तपासादरम्यान संबंधित मुलीचे आई-वडील किंवा पालकांचा शोध घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. जर कोणाला या मुलीबाबत किंवा तिच्या पालकांबाबत कोणतीही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ संभाजीनगर परळी वैजनाथ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद संगीताताई चव्हाण यांना द्या, बीड जिल्ह्यातील जनतेकडून होत आहे मागणी

वडवणी । प्रतिनिधी

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी बीड जिल्ह्यातील बंजारा समाजाची लेक असलेल्या संगीताताई चव्हाण यांचीच नेमणूक करावी, अशी मागणी बीड जिल्ह्यातील लाडक्या बहिणींसह सर्वसामान्य लोकांकडून होत आहे. संगीताताई चव्हाण या सध्या महिला आयोगाच्या सदस्य असल्यामुळे आणि सर्वसामान्य परिवारातून आल्या असल्यामुळे त्यांना महिलांच्या समस्यांची जाणीव आहे. आयोगावर काम करण्याचा अभ्यास आहे, त्यामुळे त्यांनाच ही संधी मिळावी, असा आग्रह आता होऊ लागला आहे.



राज्यातील खरात प्रकरणामुळे विद्यमान अध्यक्ष रूपालीताई चाकणकर यांनी राजीनामा दिला आहे. त्यांच्या राजीनाम्यामुळे या ठिकाणी आता पुढे कोणाची वर्णी लागेल, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. सर्वसामान्य महिलांचे प्रश्न आणि सर्वसामान्य महिलांचे जीवन ज्या महिलेला माहित आहे, महिलांचे होणारे शोषण दूर करण्याची धमक असलेली महिला, बीड सारख्या ग्रामीण भागातून एका तांड्यावरील बंजारा समाजाची असलेली लेक संगीताताई चव्हाण या एक सक्षम महिला आहेत. मागील अनेक वर्षांपासून त्यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केलेली आहे. स्वतः तांड्यावर राहिलेल्या असल्यामुळे त्यांना महिलांच्या समस्यांची जाणीव आहे. वाड्यावस्त्या, तांड्यावर जाऊन त्या महिलांचे प्रश्न सोडवू शकतात, गोरगरीब महिलांना न्याय मिळवून देऊ शकतात आणि महिलांचे होणारे शोषण रोखू शकतात, याची जाणीव असल्यामुळे महाराष्ट्रातील समस्त लाडक्या बहिणीकडून संगीताताई चव्हाण यांच्या नावाला पाठिंबा मिळत आहे.

संगीताताई चव्हाण यांनाच महिला आयोगाचे अध्यक्षपद देण्यात यावे, अशी मागणी वडवणी ◀◀ पान ३ वर


## राज्य लोकतंत्र

### तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे

अंबाजोगाई- तालुका व शहर प्रतिनिधी
शिरूर कासार- तालुका व शहर प्रतिनिधी
आष्टी- शहर प्रतिनिधी
परळी- शहर प्रतिनिधी
धारूर- शहर प्रतिनिधी
केज - शहर प्रतिनिधी

**वृत्तपत्रांमध्ये कामाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य दिले जाईल. इच्छुकांनी ५ एप्रिल २०२६ पर्यंत संपर्क साधावा.**

**कार्यालय : दैनिक राज्य लोकतंत्र**
**कॅनॉल रोड राजीव गांधी चौक जाधव यांची बिल्डिंग दुसरा मजला बीड**

आपले अर्ज ई-मेल- rajyaloktantra75gmail.com
**संपर्क नंबर ९९२२६२२५२५/९४२३१७१७२८**


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष



# पुणे विमानतळावर ७७ कोटींचा हायड्रोपोनिक गांजा

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे विमानतळावरील मालवाहतूक विभागात सीमाशुल्कच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने धडक कारवाई करत तब्बल ७६ किलो ५८० ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा जप्त केला. या साठ्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे ७७ कोटी रुपये असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.



याप्रकरणी नवी मुंबईतील व्यावसायिक समीर सुरेश अष्टेकर (वय ५८) याला अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे अवघ्या चार दिवसांपूर्वी 'पुढारी'ने प्रसिद्ध केलेल्या वृत्तावर शिक्कामोर्तब झाले आहे. थायलंडमध्ये अलीकडेच लागू झालेल्या निर्बंधांमुळे गांजाच्या तस्करीत वाढ होत असल्याची बातमी दैनिक 'पुढारी'ने प्रसिद्ध केली होती. त्याच पार्श्वभूमीवर आता थायलंडमधूनच कोट्यवधींचा गांजा पुण्यात उतरवण्याचा प्रयत्न उघड झाल्याने आंतरराष्ट्रीय रॅकेट किती खोलवर रुजले आहे, हे स्पष्ट झाले आहे. सीमाशुल्क विभागाला थायलंडवरून आलेल्या ४५ बॉक्सच्या मालाबाबत संशय आला. कागदपत्रांवर हा माल 'मँडरिन संत्र्याचे तुकडे' असा दाखवण्यात आला होता. मात्र, अधिकाऱ्यांना काही तरी संशयास्पद वाटल्याने पंचांच्या उपस्थितीत तपासणी सुरू करण्यात आली. एक्स-रे तपासणीतच मालातील विसंगती स्पष्ट झाली. बॉक्स उघडल्यावर त्यात चांदी रंगाचे डबे आणि त्यामध्ये हवाबंद पिशव्या आढळल्या. या पिशव्यांमध्ये हिरवट रंगाचा, तीव वासाचा पदार्थ भरलेला होता. चाचणी घेतली असता तो उच्च प्रतीचा हायड्रोपोनिक गांजा असल्याचे निष्पन्न झाले.

यावेळी अधिकाऱ्यांनी सर्व ४५ बॉक्स उघडले असता एकाच प्रकारे पॅकिंग केलेल्या २६८ पिशव्या सापडल्या. एकूण वजन ७६ किलो ५८० ग्रॅम इतके भरले. हा संपूर्ण साठा सात वेगवेगळ्या पिशव्यांमध्ये भरून सील करण्यात आला होता. थायलंडहून थेट भारतात गांजाची तस्करी करण्यासाठी नवीन मार्ग शोधले जात असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. अष्टेकर याला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. कस्टम विभागाच्या वतीने विशेष सरकारी वकील ऋषीराज वाळवेकर यांनी बाजू मांडली. या प्रकरणाचा तपास अद्याप सुरू असून, या आंतरराष्ट्रीय तस्करी साखळीतील इतर साथीदारांचा शोध सुरू आहे. दरम्यान, एवढ्या मोठ्या प्रमाणावर गांजा पुण्यात उतरवण्याचा प्रयत्न झाल्याने विमानतळावरील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. सीमाशुल्क विभागाच्या या कारवाईमुळे मात्र मोठ्या तस्करीला बेक लावण्यात यश आले आहे.

# भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी रूपाली चाकणकर यांना 'एसआयटी'ने बजावले समन्स

**पुणे । प्रतिनिधी**

भोंदूबाबा अशोक खरात याच्या वादग्रस्त प्रकरणामुळे राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. आता या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने (डखढ) राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांना चौकशीसाठी समन्स बजावल्याची माहिती समोर येत आहे.



अशोक खरात याच्याशी संबंधित 'शिवनिका ट्रस्ट'च्या आजी-माजी सदस्यांची आणि ट्रस्टींची चौकशी एसआयटीकडून केली जाण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर रूपाली चाकणकर यांनाही चौकशीला सामोरे जावे लागणार आहे. या प्रकरणामध्ये नाव आल्यापासून चाकणकर यांच्या अडचणीत सातत्याने वाढ होताना दिसत आहे. खरात प्रकरण समोर आल्यानंतर रूपाली चाकणकर यांना गेल्या काही दिवसांत दोन मोठे राजकीय धक्के बसले आहेत. प्रथम त्यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला.त्यानंतर अवघ्या दोनच दिवसांपूर्वी त्यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा दिला आहे. कोणत्याही तपासात नाव समोर आल्यास पोलीस त्यांची बाजू पडताळून पाहण्यासाठी समन्स बजावतात. त्यानुसार, चाकणकर यांचा जबाब नोंदवून घेतला जाईल.तपासात जे तथ्य समोर येईल, त्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# शिक्षण विभागातील आयएएस प्रतिनियुक्तीला 'मॅट'चा फटका

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्षण विभागातील वरिष्ठ पदांवर भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची वर्णी लावून शिक्षण सेवेतील पदोन्नतीवर गदा आणण्याच्या राज्य शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणाला महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अर्थात 'मॅट'ने जोरदार चपराक दिली आहे. विभागातील अनुभवी सहसंचालकांच्या पात्रतेचा विचार न करता थेट बाहेरील अधिकारी लादणे हे मनमानीपणाचे आहे, असे स्पष्ट ताशेरे ओढत न्यायालयाने या प्रकरणी फेरविचार करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले आहेत.



शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आयएएस अधिकारी हे प्रशासकीयदृष्ट्या कार्यक्षम असले, तरी त्यांना महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रातील गुंतागुंतीचे प्रश्न, जुने कायदे आणि शिक्षण व्यवस्थेची सखोल माहिती नसते. यामुळे त्वरित निर्णय घेण्याऐवजी कामात अडथळे निर्माण होतात आणि विभागाची स्वायत्तता धोक्यात येते. शिक्षण विभागात सद्यःस्थितीत संचालकांची ७ पदे मान्य आहेत. त्यापैकी ३ जागांवर नियमित संचालक कार्यरत असून, उर्वरित ४ रिक्त जागांपैकी ३ जागांवर शासनाने आयएएस अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने वर्णी लावली आहे. यावरून शिक्षण वर्तुळात अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. पुणे हे राज्याचे शैक्षणिक माहेरघर असल्याने अनेक आयएएस अधिकारी आपल्या वैयक्तिक सोयीसाठी येथे बदली मिळविण्याचा प्रयत्न करतात. २०१३ मध्ये 'शिक्षण आयुक्त' पद निर्माण करून अशाच प्रकारे विभागाच्या रचनेत घोळ घातला गेला. तसेच, तीन वर्षांपूर्वी सहसंचालक पदावर अशाच प्रकारे बाहेरील अधिकारी प्रतिनिधीने राज्य शासनाने नियुक्त केले होते, त्यास 'मॅट'ने तत्काळ स्थगिती दिली होती, असे असूनही पुन्हा पुन्हा तोच कित्ता राज्य शासन गिरवत आहे. परंतु 'मॅट'च्या या निकालामुळे शिक्षण विभागातील उपसंचालक आणि सहसंचालक स्तरावरील अधिकाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ (प्रशासकीय शाखा) मधील १० वरिष्ठ सहसंचालकांनी शासनाच्या या अन्यायकारक धोरणाविरोधात दाद मागितली होती. यावर न्यायमूर्ती मंगेश पाटील (अध्यक्ष) आणि ए. एम. कुलकर्णी (सदस्य) यांच्या खंडपीठाने २७ मार्च २०२६ रोजी निकाल दिला. विभागातील अधिकाऱ्यांच्या सक्षमतेची पडताळणी केली जात नाही, तोपर्यंत शासन केवळ प्रशासकीय निकड सांगून आयएएस अधिकाऱ्यांची नियुक्ती करू शकत नाही. त्यामुळे पुढील सहा आठवड्यांत शासनाने या १० सहसंचालकांच्या पात्रतेचा विचार करावा आणि त्यांना संचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार देता येईल का, हे तपासावे. जर विभागातील अधिकारी सक्षम आढळले, तर सध्या कार्यरत असलेल्या आयएएस अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती रद्द करून त्यांना मूळ केडरमध्ये परत पाठवणे गरजेचे आहे.

# आता उत्तरपत्रिकांचे 'ऑनस्क्रीन' मूल्यांकन होणार!

## पुणे विद्यापीठाचा मोठा निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील दिरंगाई आणि पुनर्मूल्यांकनासाठी लागणारा प्रदीर्घ वेळ आता लवकरच इतिहासजमा होणार आहे. गेल्या तीन वर्षांपासून रेंगाळलेली 'ऑनस्क्रीन मूल्यांकन' पद्धत विद्यापीठ प्रशासनाने पुन्हा एकदा अजेंड्यावर घेतली असून, लवकरच प्रायोगिक तत्त्वावर याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाचणार असून, निकाल प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे.

विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेच्या दुसऱ्या दिवशी पुनर्मूल्यांकनाच्या मुद्द्यावरून प्रशासनाला सदस्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. अधिसभा सदस्य ईशानी जोशी यांनी उत्तरपत्रिकांच्या फेरतपासणीला होणाऱ्या विलंबामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात येत असल्याचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी कबुली दिली की, वाढती स्वायत्त महाविद्यालये आणि शिक्षकांच्या उपलब्धतेअभावी पुनर्मूल्यांकन प्रक्रिया कठीण झाली आहे. ही मनुष्यबळाची मर्यादा लक्षात घेऊन आता तंत्रज्ञानाची मदत घेतली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या नव्या आराखड्यानुसार परीक्षेनंतर उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग करून त्या 'क्लाउड'वर जतन केल्या जातील. विद्यार्थ्यांनी मागणी केल्यास त्यांना घरबसल्या ऑनलाइन उत्तरपत्रिका सहज उपलब्ध करून देणे शक्य होईल.

डॉ. सुरेश गोसावी

यामुळे पुनर्मूल्यांकन प्रक्रिया अधिक वेगवान होणार आहे. सुरुवातीला काही ठराविक विभाग आणि विद्याशाखांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर हे ऑनस्क्रीन मूल्यांकन राबविण्याचे नियोजन प्रशासनाने केले असून, त्याबाबतच्या प्राथमिक बैठका पार पडल्या आहेत. दुसरीकडे, अधिसभा सदस्य डॉ. अपर्णा लळिंगकर यांनी विद्यापीठाच्या 'क्सेसॅब्लिटी ऑडिट'बाबत प्रशासनाला धारेवर धरले.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांनुसार अध्ययन स्रोत दिव्यांगांसाठी सुलभ नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. त्यावर प्रशासनाने स्पष्ट केले की, १७ फेब्रुवारी २०२३ च्या तपासणीनंतर आता नवीन संकेतस्थळ विकसित केले असून, ते लवकरच कार्यान्वित होईल. दरम्यान, अधिसभेत सदस्यांच्या प्रश्नांना योग्य पद्धतीने उत्तरे दिली जात नसल्याने गोंधळ निर्माण झाला होता, अखेर सदस्यांच्या तीव्र नाराजीनंतर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी सभागृहाची दिलगिरी व्यक्त केली.


# हिंजवडीतील गॅस एजन्सीवर कारवाई; सिलिंडर विक्रीवर बंदी

**पुणे । प्रतिनिधी**

बेकायदा आणि चढ्या दराने गॅस सिलिंडर विकल्याप्रकरणी हिंजवडी येथील मे. श्री लक्ष्मी भारत गॅस या एजन्सीवर जिल्हा प्रशासनाने कारवाई केली आहे. एजन्सीला तत्काळ पुरवठा बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून, वितरणाचा परवाना देखील रद्द करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधळकर यांनी दिली. जिल्ह्यातील ही पहिलीच कारवाई ठरली आहे.



या एजन्सीकडे भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडमार्फत व्यावसायिक एलपीजी सिलिंडर विक्रीचा अधिकृत परवाना आहे. मात्र, गुरुवारी (दि. २६) सिलिंडर वितरण करताना राज्य सरकारने ठरवून दिलेल्या प्राधान्यक्रमाचे पालन न करता अनधिकृत व नोंदणी नसलेल्या व्यक्तींना सिलिंडर वाटप केल्याचे आढळले. तसेच अधिक नफा मिळविण्याच्या उद्देशाने जादा दराने सिलिंडर विक्री केल्याचेही निदर्शनास आले आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये एलपीजी पुरवठ्याबाबत गैरसमज निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी तत्काळ कारवाईचे निर्देश दिले. त्यानुसार संबंधित एजन्सीचा परवाना निलंबित करण्यात येत आहे. तसेच, या आदेशांची तातडीने अंमलबजावणी करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधळकर यांनी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांना दिले आहेत



# वरंध घाट रस्ता ३० एप्रिलपर्यंत बंद; रस्त्याच्या कामामुळे निर्णय

**भोर । प्रतिनिधी**

महाड-भोर-पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावरील महाड ते भोरदरम्यान असलेला वरंध घाट रस्त्याच्या कामासाठी आणि सुरक्षिततेच्या कारणासाठी २५ मार्च ते ३० एप्रिलपर्यंत बंद करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी बुधवारी (दि. २५) याबाबतचा आदेश दिला असल्याची माहिती प्रांताधिकारी डॉ. विकास खरात यांनी दिली.

घाटातील हिर्डोशी ते वरंध घाटातील (कि. मी. ७०/९०० ते ९२/००३) या २१ किलोमीटर अंतराच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. हे क्षेत्र दरडप्रवण आहे. या जागेवरील परिस्थितीनुसार रस्त्याच्या हिर्डोशी ते वरंध या घाट लांबीमध्ये बऱ्याच ठिकाणी वेडीवाकडी धोकादायक वळणे आहेत. २१ किलोमीटर अंतरापैकी साडेतीन किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा अर्थसंकल्प तुटीत

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प ४ कोटी ३२ लाख ७१ हजार रुपयांच्या तुटीसह सादर करण्यात आला. अर्थसंकल्पानुसार विद्यापीठाचे एकूण अपेक्षित उत्पन्न ६१९ कोटी रुपये असून, खर्चाचा अंदाज ६२४ कोटी रुपये इतका आहे. निर्माण झालेली तूट विद्यापीठाच्या निधीवर टाकण्यात आली आहे.



राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात अपेक्षित वाढ न झाल्याने उत्पन्नवाढ मर्यादित राहिली आहे. अर्थसंकल्पातील नियमित खर्चामध्ये वेतन, निवृत्तिवेतन, परीक्षा व मूल्यमापन आणि प्रशासकीय खर्च यांचा मोठा वाटा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात संशोधन आणि नवोपक्रमावर विशेष भर देण्यात आला आहे. युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट रिसर्च फंड, संशोधन संवर्धन योजना, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस आणि आंतरराष्ट्रीय अतिथी प्राध्यापक योजना, यांसाठी निधी देण्यात आला आहे. पायाभूत सुविधांसाठी माहिती तंत्रज्ञान सुविधा, स्मार्ट कॅम्पस, सीसीटीव्ही देखरेखव्यवस्था आणि विभागांचे आधुनिकीकरण, यासाठी तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी कल्याणासाठी सुरक्षा विमा, कौशल्य विकास, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रम तसेच समर्थ भारत अभियान यांसाठीही निधी राखीव ठेवण्यात आला आहे. यंदा विद्यापीठाने ६१९ कोटी जमेचा आणि ६२४ कोटी खर्चाचा अर्थसंकल्प मांडून वेल्फेअर ण्ड ऑर्दर फंडसाठी ७८ कोटी रुपयांची वेगळी तरतूद केली आहे. त्यामुळे दिसताना ४ कोटी ३२ लाख ७१ हजार रुपयांची तूट दिसत असली तरी प्रत्यक्षात ही तूट ८२ कोटी ३२ लाख ७१ हजारांची असल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पात देखील ८२ कोटी ३९ लाख २९ हजारांची तूट दाखविण्यात आली असल्याचे दिसून येत आहे.

# पुणे एसीबी चा मोठा झटका!

### वन विभागाच्या अधिकाऱ्याला ४ लाखांची लाच घेताना रंगेहात पकडले

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई करत वन विभागातील एका अधिकाऱ्याला ४ लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक केली आहे. ही कारवाई आज (दि. २९ मार्च) दुपारी आरणेश्वर चौक परिसरात करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव उदयसिंग भिमराव कुंभार (४६) असे असून ते उपवनसंरक्षक कार्यालय, सेनापती बापट रोड येथे वनक्षेत्र सर्वेक्षक म्हणून कार्यरत आहेत




तक्रारदार हे जमीन खरेदी-विक्री व्यवसाय करतात. वडगाव मावळ तालुक्यातील काही जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावर असलेले खाजगी वनाचे शेरे काढून टाकण्यासंदर्भात महसूल विभागाने 'रिस्टोर्ड ऑर्डर्स' दिल्या होत्या. या ११ ऑर्डर्सच्या प्रती मिळवण्यासाठी तक्रारदाराने वन विभागाकडे अर्ज केला होता.

मात्र, या ऑर्डर्स देण्यासाठी आरोपी कुंभार यांनी सुरुवातीला ७ लाख रुपयांची लाच मागितली. तक्रारदाराने -उइ कडे तक्रार दिल्यानंतर पडताळणी करण्यात आली. यावेळी तडजोडीअंती ४ लाख रुपयांवर व्यवहार ठरल्याचे स्पष्ट झाले.

# पाटसमध्ये राजे उमाजी नाईक फलकाची तोडफोड; जय मल्हार क्रांती संघटना

पाटस : दौंड तालुक्यातील पाटस येथे मुख्य प्रवेशद्वाराजवळ असलेल्या आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या स्तंभावरील विद्युत रोषणाईयुक्त फलकाची अज्ञात व्यक्तींनी दगडफेक करून तोडफोड केल्याची घटना उघडकीस आली आहे. शनिवारी (दि. २८) रात्रीच्या सुमारास हा प्रकार घडल्याचा आरोप जय मल्हार क्रांती संघटनेने केला आहे. या घटनेच्या निषेधार्थ जय मल्हार क्रांती संघटना, समाजबांधव आणि ग्रामस्थांनी पाटस पोलिस चौकीवर मुक मोर्चा काढत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी करणारे निवेदन पोलिसांना दिले.




प्राथमिक माहितीनुसार, पाटस येथील मुख्य प्रवेशद्वाराजवळील जुना बाजारतळ परिसरातील क्रांतीस्तंभावर लावण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक फलकासह जय मल्हार क्रांती संघटनेच्या नावाच्या फलकाचीही दगडफेक करून तोडफोड करण्यात आली. शनिवारी सकाळी हा प्रकार जय मल्हार क्रांती संघटनेचे तालुका अध्यक्ष सोमनाथ खोमणे यांच्या निदर्शनास आला. घटनेची माहिती मिळताच संघटनेचे कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब गाडेकर व पोलिस हवालदार जालिंदर बंडगर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली; मात्र संबंधित घटना कॅमेऱ्यात कैद न झाल्याने तपासात अडचणी येत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ जय मल्हार क्रांती संघटनेचे नेते बापूसाहेब खोमणे, तालुका अध्यक्ष दादासाहेब खोमणे, उपसरपंच बाबा कोळेकर तसेच पंचायत समिती सदस्य शिवाजी ढमाले यांच्यासह ग्रामस्थांनी पाटस पोलिस चौकीवर मुक मोर्चा काढला. महापुरुषांची बदनामी व विटंबना करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी पोलिसांनी संबंधितांवर चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

# नोकरी गेल्याने मानसिक धक्का, मुंबईच्या आदित्य सातपुतेंचं पुण्यातील एफसी रोडवर टोकाचं पाऊल

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील (झींपश) गजबजलेल्या फर्ग्युसन कॉलेज (एफसी) रोडवरील खाऊ गल्लीत शनिवारी रात्री घडलेल्या एका धक्कादायक प्रकाराने परिसरात खळबळ उडाली. नोकरी गेल्याच्या नैराश्यातून ४१ वर्षीय आदित्य सातपुते यांनी स्वतःच्या गळ्यावर ब्लेडने वार करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना रात्री सुमारे ९.१५ वाजण्याच्या सुमारास घडली असून, वेळीच मदत मिळाल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, आदित्य सातपुते हे मूळचे मुंबईतील बोरिवली परिसरातील रहिवासी असून, सध्या पुण्यातील भोसले नगर येथे वास्तव्यास होते. नोकरी गमावल्यानंतर ते मानसिक तणावाखाली होते. या नैराश्यातूनच त्यांनी टोकाचे पाऊल उचलत एफसी रोडवरील खाऊ गल्लीत स्वतःच्या हाताने गळ्यावर ब्लेडने वार केले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे तेथील नागरिक आणि दुकानदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेनंतर आजूबाजूच्या नागरिकांनी तत्काळ मदत करत जखमी अवस्थेत असलेल्या सातपुते यांना जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पुढील तपास सुरू केला.